सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अजित पवार विमान अपघात प्रकरणात नवे वळण प्रमोद हिंदुरावांचा प्रफुल्ल पटेलांवर सूचक आरोप

### कल्याणमधील शोकसभेतील व्हायरल व्हिडिओतून धक्कादायक खुलासा; 'फाईलमुळे उशीर, म्हणून विमानप्रवास'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनावर आरोप आणि शंका घेतल्या जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी आमच्या पक्षाचे बडे नेते प्रफुल्ल पटेल यांनी आणलेल्या कामाला उशीर झाल्यामुळे अजित पवार यांना कारऐवजी विमानाने जावे लागले आणि त्याच विमानाला अपघात झाला, अशी धक्कादायक माहिती दिली आहे.

१ फेब्रुवारी रोजी कल्याण येथे आयोजित केलेल्या सर्वपक्षीय शोकसभेत प्रमोद हिंदुराव यांनी केलेल्या भाषणाच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओतून ही माहिती समोर आली आहे.

अजित पवार यांचे बाय रोड जाण्याचे ठरले होते. सर्व बॅगा गाडीत टाकल्या. परंतु त्याचवेळी प्रफुल्ल पटेल की आणखी कोणाचा तरी दादांना फोन आला. मंत्रालयात एक फाईल अडकली असून त्याच्यावर सही हवी आहे. म्हणून अजित पवार यांनी



सचिवाला फोन केला, ती फाईल लवकर घेऊन ये, पुन्हा मी आठवडाभर नाही, असे त्यांनी सचिवाला सांगितले. परंतु फाईल आणायला साडेसात-आठ वाजले. मग उशीर झाल्यानंतर त्यांनी ड्रायव्हरला सांगितले की, मी विमानाने जातो. गाडीतल्या बॅगा त्यांनी परत काढल्या आणि ती अघटित घटना घडली.

**रोहित पवारांनी केला नाव न घेता उल्लेख**

शरद पवार गटाच्या पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मुंबईत नुकत्याच आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत विमान अपघाताची तांत्रिक आणि इतर माहिती दिली होती. यासोबतच कोणाचेही नाव न घेता रोहित यांनी पूर्व विदर्भातील एका नेत्याने आणलेल्या फाईलचे काम करण्यास उशीर झाल्यामुळे अजित पवार यांना विमानाने जावे लागले, असे सांगितले होते. परंतु, हिंदुराव यांच्या व्हायरल झालेल्या व्हिडीओतून थेट प्रफुल्ल पटेल यांचे नाव प्रथमच समोर आले आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेससह इतर राजकीय पक्षांमध्येही खळबळ उडाली आहे.

## राष्ट्रवादीच्या विलिनीकरणानंतर आम्ही पक्षाचे नेतृत्व अजित पवारांकडे देणार होतो

### शरद पवार गटाच्या साप्ताहिकातून मोठा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

मागील अनेक दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी पक्षाचे विलिनीकरणबाबत चर्चा सुरू आहेत. महानगरपालिका निवडणुकांच्या काळातच दोन्ही पक्ष एकत्र करण्याबाबत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत बैठका झाल्याचे आमदार जयंत पाटील यांनी सांगितले होते. दरम्यान, आता 'राष्ट्रवादी शरदचंद्र पवार' पक्षाच्या साप्ताहिकातून मोठा दावा करण्यात आला आहे. विलिनीकरण झाल्यानंतर पक्षाचे संपूर्ण नेतृत्व अजित पवार यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय आमचा होता, असे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी अध्यक्षीय लेखात म्हटले आहे.



साप्ताहिकेतील या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहेत. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. अजितदादांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाच्या चर्चा सुरू आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातील नेत्यांनी याबाबत अनेक दावे केले होते. यासाठी बैठकाही झाल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, आता शशिकांत शिंदे यांनी साप्ताहिकात मोठा दावा केला आहे.

विलिनीकरणानंतर आम्ही पक्षाचे सर्व नेतृत्व अजित पवार यांच्याकडे देणार होतो. पण दादांचे स्वप्न अपूर्ण राहिले आहे. त्यामुळे आपली जबाबदारी आहे की, दादांचे स्वप्न पूर्ण करायचे. त्यासाठी प्रत्येकाने मन मोठं करून प्रामाणिक प्रयत्न केले पाहिजेत आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विलिनीकरण घडवून आणून पक्ष पुन्हा मजबुतीने उभा करणे, हीच दादांना खरी श्रद्धांजली ठरेल,असंही शशिकांत शिंदे यांनी साप्ताहिकामध्ये म्हटले आहे.

## तटकरे, पटेल व्हिलन कसे? त्यांना का टार्गेट करताय? हसन मुश्रीफांचा रोहित पवारांना थेट सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणी अनेक आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. आमदार रोहित पवार यांनी यात संशय व्यक्त केला आहे. तर, या अपघाताला राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन नेते जबाबदार असल्याचा दावाही करण्यात येतोय. अजित पवारांना कोणत्या नेत्यामुळे उशीर झाला, जेणेकरून त्यांना विमानाने बारामती गाठावं लागलं? त्यांनी नेमक्या कोणत्या फाईलवर सही केली होती? यावरही चर्चा सुरू आहेत. दरम्यान, आता हसन मुश्रीफ यांनी रोहित पवारांवर टीका केली आहे.

हसन मुश्रीफ म्हणाले, आमदार रोहित पवार यांनी मुंबई आणि दिल्लीत २८ जानेवारी रोजी झालेल्या अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत काही प्रश्न उपस्थित केले आहेत. सखोल अभ्यास करून प्रेजेंन्टेशन देण्याचा प्रयत्न केला आहे. या शंका उपस्थित झाल्या आहेत, ज्याबद्दल अनेक आक्षेप घेतले आहेत त्याची सखोल चौकशी केली जाईल. मुख्यमंत्र्यांनी हा विषय गांभीयनि घेतला आहे. रोहित पवारांना माझी विनंती आहे की त्यांच्या चुलत्यांचा अपघात झाला आहे, त्यांना दुःख झालंय तसंच आम्हालाही झालं आहे. आमच्याही मनातील शंका मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केली आहे. पण आमच्या पक्षाती अंतर्गत गोष्टीत भाग घेऊ नये. तसंच, अजित पवारांच्या अपघाताबाबत जी माहिती दिली आहे, त्याचा पाठपुरावा ते करत आहेत. पुतण्या म्हणून त्यांची अस्वस्थता समजू शकतो', असं हसन मुश्रीफ म्हणाले.



### दोघेही व्हिलन कसे होऊ शकतात?

सुनील तटकरे, प्रफुल पटेल यांची दादांबरोबर अनेकवेळ्या भेटी झाल्या आहेत. प्रफुल्ल पटेल हे राष्ट्रवादीचे शरद पवारच्या कार्यकाळापासून कार्याध्यक्ष आहेत. आता राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा वहिनींना केलं जाईल तरीही ते कार्याध्यक्ष राहणारच आहेत. तटकरे प्रदेशाध्यक्ष आहेत. मतदाना दिवशी मी खुलासा केला होता की हे दोघेही व्हिलन कसे होऊ शकतात? यांना टार्गेट का केलं जातंय? सुनील तटकरे प्रदेशाध्यक्ष आहेत, त्यामुळे ते आमदारांची बैठक बोलावत असतील तर त्यांची चूक काय? एकंदरीत पवार साहेबांपासून ही मंडळी तेथे आहेत, आजही तेथे होते. रोहित पवार विनाकारण टार्गेट करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणालेत.





## टी-२० वर्ल्डकपमध्ये मोठा उलटफेर झिम्बाब्वेकडून ऑस्ट्रेलियाचा पराभव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३कोलंबो**

टी-२० विश्वचषकात पहिला उलटफेर सामना झाला. झिम्बाब्वेने ऑस्ट्रेलियाला २३ धावांनी हरवले. हा संघाचा दुसरा टी-२० विश्वचषक विजय होता. १९ वर्षांपूर्वी २००७ मध्ये त्यांनी लीग टप्प्यात ऑस्ट्रेलियालाही हरवले होते.

कोलंबो येथील आर. प्रेमदासा स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. झिम्बाब्वेने २० षटकांत २ गडी गमावून १६९ धावा केल्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलिया १९.३ षटकांत १४६ धावांवर सर्वबाद झाला. ब्लेसिंग मुझाराबानीने ४ विकेट घेतल्या आणि ब्रॅडली इव्हान्सने ३ विकेट घेतल्या.

ऑस्ट्रेलियाकडून मॅट रेनशॉ (६५ धावा) यांनी अर्धशतक झळकावले. ग्लेन मॅक्सवेलने ३१ धावा केल्या. मार्कस स्टोइनिस (६), ट्रॅव्हिस हेड (१७) आणि जोश इंग्लिस (८) यांना चांगली कामगिरी करता आली नाही. टिम डेव्हिड आणि कॅमेरॉन ग्रीन यांना धावा करता आल्या नाहीत.

झिम्बाब्वेच्या ब्रायन बेनेटने ५६ चेंडूत नाबाद ६४ धावा केल्या. हे त्याचे टी-२० विश्वचषकातील पहिले आणि टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील एकूण ११ वे अर्धशतक होते. त्याच्या व्यतिरिक्त, तादिवानाशे मारुमानी आणि रायन बर्ल यांनी प्रत्येकी ३५ धावा केल्या. कर्णधार सिकंदर रझाने १३ चेंडूत नाबाद २५ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून मार्कस स्टोइनिस आणि कॅमेरॉन ग्रीन यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.सध्या, ऑस्ट्रेलिया ग्रुप बी पॉइंट्स टेबलमध्ये तिसऱ्या स्थानावर आहे, त्यांनी त्यांच्या दोन सामन्यांपैकी एक सामना गमावला आहे. त्यांचे दोन गुण आहेत.

आता, पुढील दौऱ्यात जाण्यासाठी, कांगारूंना श्रीलंका आणि ओमानविरुद्धचे सामने जिंकावे लागतील. त्यांना श्रीलंका आणि झिम्बाब्वे प्रत्येकी एक सामना गमावतील अशी आशा देखील करावी लागेल.

## चंद्रपूर प्रकरण, उद्धवसेनेचे आव्हान मनसेने स्वीकारले; संदीप देशपांडे म्हणाले, पुरावे देणार

### उद्धवसेनेने भाजपाला पाठिंबा दिल्यावरून मनसेने केली सडकून टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

चंद्रपूर महापालिकेत २७ नगरसेवक असलेल्या काँग्रेसचा गटबाजीने महापौरपदाच्या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला. भाजपाने थेट उद्धवसेनेच्या पाठिंब्याने पालिकेवर पुन्हा वर्चस्व मिळविले. भाजपाच्या संगीता खांडेकर यांनी अवघ्या एका मताने काँग्रेसच्या वैशाली महाडुळेंचा पराभव करत महापौरपदी विजय मिळवला. उपमहापौरपदासाठी उद्धवसेनेचे प्रशांत दानव व काँग्रेस समर्थित पप्पू देशमुख यांना समसमान ३२ मिळाल्याने ईश्वरचिठ्ठीने दानव यांची निवड झाली. यानंतर आता यावरून आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. यातच उद्धवसेनेचे जिल्हाध्यक्ष संदीप गिऱ्हे यांनी दिलेले आव्हान संदीप देशपांडे यांनी स्वीकारले आहे.



संदीप देशपांडे यांना ही माहिती कुणी दिली, ते आम्हाला माहिती नाही. संदीप देशपांडे यांनी त्या व्यक्तीचे नाव जाहीर करावे. त्यांनी सांगितले की, कुणी आम्हाला पैसे देऊन विकत घेतले असेल, तर आत्ता मी या पदाचा राजीनामा देतो. आम्ही स्थानिक लढाई लढलो. आमच्या इथे जे राजकारण झाले, ते आमचे आम्हाला माहिती आहे. काँग्रेसने वारंवार आमचा अपमान केला. आम्ही अनेकवेळा काँग्रेसच्या ऑफिसमध्ये बसून होतो. आम्ही वडेट्टीवारांच्या यांच्या घरी जाऊन बसलो होतो. भाजपाकडून पैसे घेतले असते किंवा घ्यायचे असते, तर आम्ही हे सगळे केले नसते, असे संदीप गिऱ्हे यांनी सांगितले. यावरून आता संदीप देशपांडे यांनी एक्सवर एक पोस्ट करत पुरावे देणार असल्याचे म्हटले आहे.

**पुरावा देणार म्हणजे देणार**

ज्या दिवशी जनतेला तुम्ही पन्नास खोक्यांचे पुरावे द्याल त्या दिवशी शंभर टक्के चंद्रपूरमधल्या एक खोक्याचा पुरावा देणार म्हणजे देणार, असे संदीप देशपांडे यांनी एक्सवर म्हटले आहे. तत्पूर्वी, चंद्रपूर महापालिकेसंदर्भात मला मिळालेली माहिती आहे की, उद्धवसेनेच्या नगरसेवकांना एक-एक कोटी देण्यात आले आहेत. वरून त्यांना वेगळ्या ऑफर दिल्या आहेत. असा मोठा दावाही संदीप देशपांडे यांनी केला. तसेच खासदार संजय राऊत यांना अंधारात ठेवले की त्यांनी स्वतःहून डोळ्यावर पट्टी बांधली, हे पाहावे लागेल. संजय राऊत यांचे असे झाले आहे की, 'तुम करे तो रासलीला आणि हम करे तो कॅरेक्टर ढिला', असे कसे चालेल, असे संदीप देशपांडे यांनी म्हटले होते.

दरम्यान, आम्हाला भाजपाकडून पैसे घ्यायचे असते तर शेवटच्या क्षणापर्यंत काँग्रेससोबत वाटाघाटी केली नसती. १ कोटी आले असते तर आलिशान हॉटेलमध्ये बसून चर्चा केली असती. आम्ही जे काही केले ते स्वाभिमानासाठी केले, संदीप देशपांडे स्वतः शिवसैनिक राहिलेले आहे, त्यामुळे त्यांनी असा शिवसैनिकांचा अपमान करू नये, त्यांनी पुरावा द्यावा, आम्ही सगळे शिवसैनिक आणि पदाधिकारी राजीनामा देतो, असे आव्हान संदीप गिऱ्हे यांनी दिले.

## संदीप देशपांडे मनसे प्रवक्ते, जे बोलतात ती शिंदे गटाची की भाजपची भूमिका?

### वारंवार तुम्ही टीका का करता? रुसवे फुगवे असेल तर दोन ठाकरे बंधू बोलतील



**विदर्भ प्रजासत्ताक दि. १३ मुंबई**

चंद्रपूर महानगरपालिकेमध्ये काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि खासदार प्रतिभा धनोरकर यांच्या वादामध्ये काँग्रेसला महानगरपालिकेमधील आलेली सत्ता गमवावी लागली. तब्बल २७ नगरसेवक निवडून आणूनही काँग्रेस सत्तेपासून दूर राहिला. त्यामुळे भाजपचा महापौर आणि शिवसेना ठाकरे गटाचा उपमहापौर झाल्याने राजकीय चर्चा रंगली आहे. शिवसेना ठाकरे गटावर या संदर्भात होत असलेल्या टीकेला खासदार संजय राऊत यांच्याकडून उत्तर दिला जात असतानाच आज थेट मनसे प्रवक्ते देशपांडे यांनी विश्व प्रवक्ते म्हणत अचानक राऊत यांच्यावर टीका केली. त्यामुळे संदीप देशपांडे यांनी घेतलेल्या भूमिकेवरून चर्चा रंगली आहे. देशपांडे यांनी केलेल्या टीकेनंतर शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते अखिल चित्रे यांनी देशपांडे यांना टोला लगावला आहे.

संदीप देशपांडे हे मनसेचे प्रवक्ते असताना ते त्या पद्धतीने बोलतात ते शिवसेना शिंदे गटाची भूमिका मांडतात की भाजपची भूमिका मांडतात? असा खोचक सवाल अखिल चित्रे यांनी केला. संदीप देशपांडे यांना मुंबईत बसून चंद्रपूरमध्ये काय चाललय कसं कळतं मला माहित नसल्याचाही टोला त्यांनी लगावला. ते म्हणाले की रुसवे फुगवे असतील, तर दोन ठाकरे बंधू आपापसात बोलतील. ठाकरे बंधूंची युती आहे त्यामुळे काही गोष्टी पाळाव्यात. वारंवार तुम्ही टीका का करताय? अशी विचारणा त्यांनी केली. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये मनसे आणि शिवसेना एकत्र लढली होती. चंद्रपूरमध्ये आम्ही मनसेसोबत लढलो नव्हतो याकडे चित्रे यांनी लक्ष वेधलं. संदीप देशपांडे जे बोलत आहेत ते कोणाला फायदा करू इच्छित आहेत? अशी विचारणाही त्यांनी केली.

दरम्यान, परभणीमध्ये मुस्लिम महापूर करण्यावरूनही अखिल चित्रे यांनी प्रतिक्रिया दिली. मातृसंस्थेच्या कार्यक्रमासाठी सलमान खानला बोलवतात ते मुसलमान त्यांना चालतात, पाकिस्तानी वंशाचा अदनान सामी चालतो तेव्हा तुमचे हिंदुत्व कुठे गेलं? राजकीय स्वार्थासाठी हिंदुत्व तुम्ही शिकवू नये, अशी टीका त्यांनी केली.

## महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ काँग्रेसच्या बड्या नेत्याविरुद्ध अटक वॉरंट



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नागपूर**

राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष आणि माजी मंत्री रणजित देशमुख यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. रणजित देशमुख यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. धनादेश न वटल्याने न्यायाधीशांनी त्यांच्याविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी केला आहे. त्यामुळे देशमुखांना मोठा धक्का बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनादेश न वटवल्याच्या प्रकरणात वारंवार न्यायालयात हजर न राहिल्याने रणजीत देशमुख यांच्यासह तिघांविरोधात अजामीनपात्र अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे. याचिकाकर्ते अतुल देवगडे यांनी याप्रकरणी याचिका दाखल केली होती. ११ लाख रुपयांचे ५ धनादेश देवगडे यांना देण्यात आले होते, त्यापैकी एकही धनादेश वठला नाही.

धनादेश अनादर प्रकरणात अतुल प्रभाकर देवगडे यांनी न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली होती. या तक्रारीत त्यांनी असे म्हटले आहे की, परसेप्ट वेब सोल्यूशन प्रा. लिमिटेडच्या संचालकांनी संगणक, इंटरनेट आणि वेबसंदर्भातील साहित्य खरेदी केले होते. रणजित देशमुख, पल्लवी पारेख आणि अमित धुपे हे या कंपनीचे संचालक आहेत. कंपनीने ११,५०,००० रुपयंचे ५ धनादेश दिले. यातील एकही धनादेश वठला नाही.

वारंवार पाठपुरावा करून आणि कायदेशीर नोटीस पाठवूनही उत्तर मिळत नाही त्यामुळे अतुल देवगडेंनी न्यायालयात धाव घेतली. तिघांनी देखील जामीन घेतला. पण या प्रकरणी खटला सुरू करण्यापूर्वी तिघांनी न्यायालयात हजर राहणे गरजेचे होते. ते या प्रकरणी न्यायालयात हजेरी लावत नसल्यामुळे न्यायालयाने तिघांविरोधात अजामीनपात्र अटक वारंट जारी केले. त्यामुळे रणजित देशमुख यांच्या अडचणी वाढल्यात.

## संपादकीय ......

# पाकिस्तानला उपरती!

*पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा मोहम्मद आसिफ हे पाकिस्तान मुस्लिम लीग (नवाज शरीफ) पक्षाचे ज्येष्ठ नेते. २०१३ ते २०१७ या कालावधीत ते संरक्षणमंत्री होते आणि वादग्रस्त वक्तव्ये करण्याबद्दल त्यांची ख्याती आहे. 'भारतावर अणुबॉम्ब टाकू', 'भारताला अद्दल घडवू', अशा पोकळ धमक्या त्यांनी दिल्या होत्या. पहलगाम कांडानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केल्यावर पाकच्या संसदेत काही खासदार घाबरून रडू लागले आणि आसिफ यांनाही दरदरून घाम फुटला होता. २००२ मध्ये आसिफ यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून अटक झाली होती. बेहिशेबी मालमत्ताप्रकरणी त्यांना पाच वर्षांपूर्वी तुरुंगवासही घडला होता. अशा या आसिफ यांनी आता अचानकपणे अमेरिकेवर शरसंधान केले आहे. २००१ साली अमेरिकेसाठी तालिबानविरोधात जात पाकिस्तानने पुन्हा चूक केली.*

*अमेरिका बाजूला झाला; परंतु आम्ही आतापर्यंत त्याचे परिणाम भोगत असून, त्याची भरपाई कधीही होऊ शकत नाही, असे उद्गार त्यांनी काढले आहेत. लष्करप्रमुख जनरल झिया-उल-हक आणि परवेझ मुशर्रफ यांच्यावरही त्यांनी हल्लाबोल केला. अफगाणिस्तानात १९८० साली जो विद्रोह झाला, तो अमेरिकेच्या इशार्यावर केला होता. तत्कालीन पाक सरकारने स्वतःच्या फायद्यासाठी आपल्याच लोकांना त्यात सहभागी करून गंभीर चूक केली, असे आसिफ यांचे मत आहे. थोडक्यात, अमेरिकेने पाकिस्तानचा केवळ टॉयलेट पेपरसारखा वापर करून फेकून दिले. अफगाणिस्तान युद्धात आमचा वापर केला गेला आणि काम झाल्यावर सोडून दिले. तालिबानने जिहादच्या नावाखाली जेव्हा रशियाविरोधात युद्ध पुकारले, तेव्हा पाक युद्धात उतरला; परंतु त्याचे कोणतेही निमित्त नव्हते.कारण, तो 'जिहाद'च नव्हता आणि रशियाने आफगाणिस्तानवर कब्जादेखील केला नव्हता, असा साक्षात्कार आसिफ यांना काही दशकांनंतर झालेला दिसतो. इतके दिवस अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा गुणगौरव करण्यात पाकिस्तान मग्न होता. ट्रम्प यांना शांततेचे नोबेल मिळावे, अशी मागणी करून पाकिस्तानने भाटगिरीची हद्द गाठली होती. लष्करप्रमुख असीम मुनीर यांना ट्रम्प यांनी 'व्हाईट हाऊस'मध्ये भोजनाचे आमंत्रण दिले. त्यामुळे मुनीर यांना स्वर्ग दोन बोटेच उरला होता! पाकने अमेरिकेला अफगाणिस्तान युद्धावेळी आपले हवाई क्षेत्र खुले केले. बंदरे आणि लष्करी तळांचा वापर करू दिला. हवाई इंधनभरतीची सोय करून दिली. परंतु, तरीही अमेरिका फक्त स्वतःच्या भल्याचा विचार करतो, अशी उपरती पाकिस्तानला झालेली दिसते. ट्रम्प यांना खूश करण्यासाठी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी गेल्याच महिन्यात इराणला मोठा धक्का दिला.*

*इराणला अमेरिका शत्रुस्थानी मानतो आणि ट्रम्प इराणला अण्वस्त्र केंद्रांवरून धमक्याही देत आहेत. पाकिस्तानने इराणबरोबरची गेल्या अनेक दशकांपासून अस्तित्वात असलेली रहदारी प्रणाली बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. बलुचिस्तान आणि इराणच्या सीमावर्ती भागात राहणारे लोक कौटुंबिक संबंध, व्यापार आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी स्थानिक कागदपत्रांचा वापर करून सीमा ओलांडत असत. परंतु, आता ही पद्धत रद्द केल्यामुळे या भागातील लोकांना पासपोर्ट व व्हिसाशिवाय सीमा पार करता येणार नाही. आर्थिक संकटात असलेल्या पाकिस्तानला अमेरिका आर्थिक व शस्त्रास्त्रांची मदत करतो. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान युद्धबंदी करारात निर्णायक भूमिका असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला होता. मात्र, भारताने हा दावा साफ फेटाळून लावला. त्यामुळे ट्रम्प नाराज झाले होते. या काळात अमेरिका व पाकिस्तान यांच्यातील संबंध मजबूत झाले. रशियाकडून तेलखरेदीमुळे अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क लादले. पाकिस्तानवरील शुल्क मात्र १९ टक्क्यांवर आणले होते. तेव्हा पाकिस्तान खूश झाला होता. भारतावर जास्त शुल्क लादल्याने त्याला उकळ्या फुटल्या होत्या. परंतु, आता भारत-अमेरिका व्यापार करारास अंतिम स्वरूप प्राप्त झाले असून, भारतावरील शुल्क अमेरिकेने १८ टक्क्यांवर आणल्यामुळे जागतिक व्यापार व्यवस्थेत भारताची भूमिका अधिक भक्कम होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे पाकिस्तानचे माथे भडकले आहे. शिवाय, पाकिस्तानने अमेरिकेसोबत व्यापक द्विपक्षीय व्यापार करार केलेला नाही.*

*मुळात पाकिस्तानने भारतविरोधी कारवायांसाठी १९७० ते २००० या काळात अमेरिकेची मदत घेतली होती. परंतु, आता जागतिक तसेच दक्षिण आशियातील समीकरणे बदलली असून, भारत हा जागतिक महासत्ता होण्याच्या दिशेने प्रवास करत आहे. भारताच्या विशाल बाजारपेठेचे अमेरिकेला आकर्षण आहे. भारतातील कुशल तंत्रज्ञ अमेरिकेला हवे आहेत. भारताबरोबर व्यापारात दोन्ही देशांचा फायदा आहे, हे ट्रम्प जाणतात. उलट पाकिस्तान हा आर्थिकदृष्ट्या मोडकळीस आलेला देश आहे. पाकिस्तानात कारखानदारी क्षेत्र फारसे नाही. तेथील मालाचा दर्जा चांगला नाही. शिवाय, पाकिस्तान हा सातत्याने चीनची तळी उचलत असल्याचे अमेरिकेला ठाऊक आहे. तैवानच्या मुद्द्यावरून अमेरिका व चीनचे संबंध चांगले नाहीत. चीनचा मित्र असलेला उत्तर कोरिया अमेरिकेच्या जवळचा देश नाही आणि एकेकाळी उत्तर कोरियाला पाकने अण्वस्त्र तंत्रज्ञान पुरवले होते, हे अमेरिकेला ठाऊक आहे.*

*मुळात पाकिस्तान हा दहशतवादी व दिवाळखोर देश असून, दहशतवादी कारवायांमुळे तो स्वतःच ग्रस्त झालेला आहे. अफगाणी तालिबान्यांपासून वाचवण्यासाठी अमेरिकेने मदत करावी ही पाकची इच्छा असून, तीही पूर्ण होत नाही. अफगाणिस्तानातील रशियाविरोधी युद्धात पाकिस्तानी मुजाहिद्दीनींबरोबरच ओसामा बिन लादेनही सहभागी झाला होता. या लादेनला नंतर पाकिस्ताननेच आश्रय दिला होता. लादेनने 'अल कायदा'मार्फत अमेरिकेवर हल्ला केला होता आणि अमेरिकेने पाकिस्तानात घुसून लादेनचा खात्मा केला होता. लादेनसारख्या आंतरराष्ट्रीय दहशतवाद्याला आसरा देणारा पाकिस्तान हा काय लायकीचा देश आहे, हे सर्व जगाला ठाऊक आहे. अमेरिकेला पाकिस्तानचा आता फारसा उपयोग उरलेला नाही. त्यामुळे पाकची अवस्था टॉयलेट पेपरसारखी झाली आहे, या जाणिवेमुळे ख्वाजा आसिफ यांचा भडका उडालेला दिसतो. परंतु, उशिरा झालेल्या या उपरतीमुळे पाकिस्तानला शहाणपण येईल, याची मात्र सूतराम शक्यता नाही!*

# आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर सोलर पंप, अर्ज, कागदपत्रे, वाचा संपूर्ण माहिती

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना जिल्ह्यासाठी 'गेम चेंजर' ठरणार आहे. यावर्षी जिल्ह्यातील १०० टक्के आदिवासी शेतकऱ्यांना बोरवेल आणि सोलर पंप देण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. तसेच ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या पंपांचे वीजबिल माफ करण्यात आल्याचे विभागाकडून सांगण्यात आले आहे.




बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सोलर पंप बसवण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत अर्थसाह्य (अनुदान) दिले जाते. ही योजना प्रामुख्याने आदिवासी शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राबवली जाते.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**सौर पंप योजनेची मुख्य वैशिष्ट्ये:** अनुदान : या योजनेतून सोलर पंप (सौर ऊर्जा संच) बसवण्यासाठी ५० हजार अनुदान मिळते, जे वीज जोडणी आकार व पारंपारिक पंप संचाच्या बदल्यात दिले जाते.

**पात्रता :** अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकरी, ज्यांच्याकडे स्वतःची विहीर/शेततळे आहे. इतर घटक : नवीन विहीर (४ लाख), जुनी विहीर दुरुस्ती (१ लाख), आणि शेततळे अस्तरीकरण (२ लाख) यांसारख्या इतर सुविधाही योजनेत समाविष्ट आहेत.

**अर्ज प्रक्रिया :** महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावा लागतो, आणि नंतर कागदपत्रे संबंधित पंचायत समितीच्या कृषी अधिकाऱ्याकडे जमा करावी लागतात.

महत्त्वाचे : जर लाभार्थ्याला महावितरणकडून सोलर पंप मंजूर झाला असेल, तर या योजनेअंतर्गत अनुदानाच्या मर्यादेत ५० हजार रुपये महावितरणकडे भरले जातात

**'पहिले येणाऱ्यास प्राधान्य'**

शेतकऱ्यांना सरकारी योजनांचा लाभ घेताना आता नशिबावर अवलंबून राहावे लागणार नाही. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना सोलर पंप बसवण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत अर्थसाह्य (अनुदान) दिले जाते. कृषी योजनांमधील 'लॉटरी पद्धत' आता बंद करण्यात आली आहे. याऐवजी 'पहिले येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर सर्व पात्र शेतकऱ्यांना थेट लाभ दिला जाईल. सिंचन सुविधेसाठी विहिरी, पंप आणि ठिबक सिंचनाचा विस्तार करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

# स्मार्ट पद्धतीने भात खाल्ला तर ना शुगर वाढेल ना वजन...

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**




प्रत्यक्षात भात हा आपल्या रोजच्या आहाराचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र त्याचे प्रमाण, प्रकार, शिजवण्याची पद्धत आणि भातासोबत काय खाल्ले जाते यावर रक्तातील साखरेचा परिणाम अवलंबून असतो. योग्य आहार नियोजन केल्यास भात पूर्णपणे सोडण्याची गरज नसते, तर संतुलित पद्धतीने तो आहारात समाविष्ट करता येतो.




**१. तज्ज्ञ काय म्हणतात?**

शारदा केअर हेल्थसिटीमधील औषध विभागाचे संचालक डॉ. चिराग टंडन यांनी एका संकेतस्थळाला दिलेल्या मुलाखतीनुसार, डायबिटीस असलेल्या रुग्णांनी आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आपल्या खाण्यापिण्याची योग्य निवड करणे अत्यंत गरजेचे असते. विशेषतः अशा खाद्यपदार्थांची निवड करताना काळजी घ्यावी, ज्यांचा ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) जास्त असतो. भात हा भारतीय जेवणाचा एक अविभाज्य भाग आहे, परंतु तो 'हाय-ग्लायसेमिक' आहार मानला जातो, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण वेगाने वाढू शकते. तरीदेखील, काही छोटे आणि सोपे बदल करून भात खाल्ल्यानंतर होणारी 'शुगर स्पाईक' बऱ्याच अंशी कमी करता येते.

२. डायबिटीस नियंत्रित ठेवण्यासाठी भात पूर्णपणे सोडण्याची गरज नाही... डॉ. चिराग टंडन यांच्या मते, शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी भात पूर्णपणे सोडणे आवश्यक नाही. त्याऐवजी, तो योग्य पद्धतीने शिजवणे आणि संतुलित प्रमाणात खाणे अधिक महत्त्वाचे आहे. यासाठी आपण भात खाताना, पांढऱ्या तांदूळाऐवजी ब्राऊन राईस, हातसडीचा तांदूळ किंवा बासमती तांदळाचे पर्याय निवडणे उत्तम ठरू शकते. याचे कारण असे की, या पर्यायांचा ग्लायसेमिक प्रभाव पांढऱ्या तांदळाच्या तुलनेत कमी असतो.

# व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाहीला घातक ठरू शकते

भारतात अनेक धर्म,पंथ,भाषा,जाती व धर्माप्रमाणे संस्कृती आहे.तरीही भारतीय युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करतांना दिसतात ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आजच्या सोशल मीडियाच्या युगात युवा पिढीमध्ये भारतीय संस्कृतीचा दिवसेंदिवस विसर पडत असल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येते.१४फेब्रुवारी म्हटले की युगलांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येते.परंतु यात ते भारतीय संस्कृतीचे भान विसरतांना दीसतात. जगात संपूर्ण देश आप-आपल्या संस्कृतीची जोपासना करतात.परंतु बदलत्या काळात सध्या भारतीय युवा वर्ग पाश्चिमात्य देशांमधील संस्कृतीकडे वळतांना दीसतात.ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे.भारत आपल्या संस्कृतीच्या बळावर अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे व जगात तिसरी महाशक्तीच्या रूपात उभरत असतांना पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाही देशाला घातक ठरू शकते.१४ फेब्रुवारीला व्हेलेंटाईन डे संपूर्ण जगासह भारतीय युगल मोठ्या थाटामाटात साजरा करतात.परंतु हा दीवस संपूर्णपणे भारतीय संस्कृतीच्या विरोधात असल्याचे मी समजतो.व्हेलेंटाईन डे साजरा करायला हरकत नाही.परंतु आपली संस्कृती जोपासलीच पाहिजे व कोणतेही कार्य संस्कृतीलाच धरून असावे.कारण भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगात आगळीवेगळी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे.भारतात अनेक जाती-धर्माचे लोक रहातात.त्याचप्रमाणे या पावनभुमित अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक वेशभूषा व आगळीवेगळी संस्कृती आपल्याला पहायला मिळते. आपण देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून किंवा टोकावरून निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरा नंतर आपल्याला वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.अशा परीस्थितीत संस्कृतीची जोपासना आजच्या युगातील युगलांनी करायला पाहिजे.आज जगातील अनेक देश भारतीय संस्कृती अवगत करण्याच्या मार्गावर आहेत.याचे उदाहरण कुंभमेळ्यात किंवा भारतीय सणांमध्ये दिसून येते.भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अनेक देशांतील नागरिक भारत भ्रमन करतांना दिसतात.भारतात ३६५ दिवसातील प्रत्येक दिवसाला प्रत्येक धर्मामध्ये आगळे-वेगळे महत्व असते हे आपणा सर्वांनाच माहित आहे.योगाची सुरूवात भारतातुनच झाली आणि योगाला संपूर्ण जगाने स्वीकारले जगातील मुस्लिम राष्ट्र असो किंवा कोणतेही राष्ट्र असो योगाला जास्त महत्व देतात हीच जडणघडण भारतीय संस्कृतीमध्ये आहे याची जाण युवकांनी ठेवली पाहिजे.त्याचप्रमाणे आयुर्वेद शास्त्र भारतातुन विकसित झाले व हजारो पध्दतीची औषधी युक्त वृक्ष भारतात पहायला मिळते.परंतु आपली युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळतांना दीसते हे भारतीय देवभुमिचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे




की ज्या ठिकाणी सर्वच धर्मांचे लोक आनंदाने रहातात.सोबतच भारत हा ऋशी-मुनिंचा, सुफी-साधु-संत, महाज्ञानी, क्रांतीकारक, स्वतंत्रता सेनानी,थोरपुरूषांच्या अथक प्रयत्नाने सुसंस्कृत भारत देश मोठ्या डौलाने उभा आहे. याभुमित भगवान राम, भगवान गौतम बुद्ध, महंमद पैगंबर, गुरू गोविंदसिंग इत्यादीसह अनेक देवी-देवतांचे वास्तव्य या भारत भुमीत आपल्याला पहायला मिळते. त्यांच्याच पुण्यायीने भारतीय संस्कृती विकसित झाली आहे. भारतावर सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा आशिर्वाद आहे. त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लिम, शिख, ईसाई, बौद्ध, जैन इत्यादी धर्माचा मोठा पगडा भारतीय संस्कृतीवर आहे.त्यामुळेच आज भारतात एकोप्याचे व खेळीमेळीचे वातावरण दिसून येते.ऐवढी अफाट आणि शक्तीशाली भारतीय संस्कृती असतांना भारतीय युगलांनी व युवकांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा किंवा पध्दतीचा अवलंब का करावा?व्हेलेंटाईन डे च्या माध्यमातून भारतीय संस्कृती धोक्यात येवु शकते याला नाकारता येत नाही.याचा विचार युवा पिढीतील युगलांनी करावा.व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती नुसारच साजरा करावा.कारण कोणत्या ना कोणत्या मार्गाने पाश्चिमात्य पध्दती भारतात घर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.याला रोखण्याची नितांत गरज आहे. अन्यथा भारतीय संस्कृतीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. हीबाब आजच्या नवीन पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.पाश्चिमात्य संस्कृतीचा अभ्यास अवश्य करावा.परंतु त्याचा अवलंब करू नका ही माझी आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारत दौ-यावर असताना त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रषंशा केली होती.परंतु अमेरिकेत गेल्यावर ६ फेब्रुवारी २०१५ ला भारतीय संस्कृतीवर ताशेरे ओढताना ते म्हणतात की गेल्या काही वर्षांपासून भारतात असहिष्णुता वाढली आहे.याचाच अर्थ असा की बोलतांना सांगायचे की तुमची संस्कृती चांगली आहे आणि मायदेशी गेल्यावर दुसऱ्याच्या संस्कृतीला असहिष्णुता म्हणायचे व आपल्या पाश्चिमात्य पध्दतीचा प्रचार करायचा हा कुठला न्याय? मुख्य कारण म्हणजे त्यांना भारतात सर्व धर्मांचे,जातीचे, पंथाचे लोक एकोप्याने रहातात ही बाब रूतली असावी.त्यामुळे मित्रांनो पुन्हा सांगतो की भारतीय संस्कृतीलाच स्वीकारावे व पाश्चिमात्य पध्दतीला टाटा- बाय-बाय करावे.कारण जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती अनभिज्ञआहे.भारतात रामायण, गीता, कुराण, बायबल, ग्रंथ या पाच भुजांनी बनलेला भारत व भारतीय संस्कृती आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची जोपासना करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे.मी पुन्हा एकदा सांगु ईच्छीतो की व्हेलेंटाईन डे या दीवसाला भारतीय संस्कृतीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी युगलांनी घ्यावी.भारतीय संस्कृती इतकी अबाध्य आहे की अनेक वृक्ष, फुले व फळे संस्कृतीला धरून आहे.त्यामुळे जगाच्या दृष्टीकोनातून भारतीय निसर्ग सृष्टी आगळीवेगळी दीसुन येते.आज भारत आपल्या दुश्मन देशालासुध्दा मदत करीत आहे यामागचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती होय.आठवड्याचे ७ दीवस असतात.परंतु भारतीय संस्कृतीत प्रत्येक धर्मासाठी सातही दिवसाला वेगवेगळे महत्त्व दीसुन येते.सुर्य,चंद्र,तारे संपूर्ण जग पहाते परंतु भारतात यांची वेगवेगळ्या पध्दतीने जोपासना करून प्रत्येक धर्मांच्या माध्यमातून पुजा-अर्चना केली जाते.भारतीय संस्कृतीला देवी-देवतांनी भरपूर काही दिले जे जगात तुम्हाला कुठेही पहायला मिळनार नाही.आज भारतात हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा पहायला मिळतो यातुनच सप्तरंगी धनुष्य तयार होतो.वर्षाचे १२ महीने असतात त्यात आपल्याला आगळ-वेगळ रूप,रंग पहायला मिळते.त्यामुळे भारतीय संस्कृतीची बरोबरी कोणताही देश करू शकत नाही आणि करणार नाही.करिता भारतीय संस्कृतीची जोपासना केलीच पाहिजे व पाश्चिमात्य संस्कृतीचा त्याग केला पाहिजे असे मला वाटते.कारण भारतीय संस्कृती ही जगातील अजुब्यातील एक अजुबा आहे.आपण व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती प्रमाणेच साजरा करावा.व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने आई-वडिल, बहिण-भाऊ यांचा आदरतिथ्याने सन्मान करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा यातच आपली संस्कृती आहे.यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन ऊर्जा निर्माण होवून नवचैतन्य दिसून येईल. या दिवसाला बदलते हवामान व वाढते प्रदुषण पहाता युगलांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प करावा.त्याचप्रमाणे युगलांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की,१४ फेब्रुवारी २०१९ ला पुलवामा येथे भारतीय सैन्यावर आतंकवाद्यांनी आत्मघाती हल्ला केला होता यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला हा दिवस भारतासाठी अत्यंत दु:खद दिवस ठरला.त्यामुळे व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून शहिदांना सुध्दा श्रद्धांजली वाहने गरजेचे आहे.शहिदांना कोटी कोटी प्रणाम.जय हिंद!जय भारत.

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कारकुनाला लाच घेताना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३मुंबई–** राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या मंत्रालयातील विभागाचा कारकून राजेंद्र ढेरंगे यांना लाचप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने गुरुवारी रंगेहाथ अटक केली. झिरवळ यांचे खासगी सचिव (पीएस) रामदास गाडे यांच्याच सांगण्यावरून पैसे मागितले, असा जवाब ढेरंगे याने दिल्याचे समजते.

नरहरी झिरवळ यांच्याकडे विद्यमान सरकारमध्ये अन्न व औषध प्रशासनची जबाबदारी देण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून केमिस्ट परवाने प्रकरणात लाच घेतली जात असल्याचे सांगितले जात होते. ती तक्रार अखेर खरी ठरली. मंत्री नरहरी झिरवळ यांचा कारकून राजेंद्र ढेरंगे लाच घेऊन कामे करतो, अशी मूळ तक्रार होती. हात ओले केल्याशिवाय त्याच्याकडे काम होत नाही, असे तक्रारदाराचे म्हणणे होते. वैद्यकीय परवाना देण्यासाठी राजेंद्र ढेरंगे याने ५० हजार रुपयांची मागणी केली आणि ३५ हजार रुपयांवर मांडवली झाली, या पक्षकाराच्या तक्रारीनुसार मंत्री नरहरी झिरवळ यांच्याच कार्यालयात राजेंद्र ढेरंगे याच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने सापळा रचला. मंत्री झिरवळ यांचा पीएस रामदास गाडे याच्या सांगण्यानुसारच आपण लाच घेत होतो, असे राजेंद्र ढेरंगे याने कबूल केले, असे सूत्रांचे म्हणणे आहे. मंत्रालयाच्या दुसर्या मजल्यावर अन्न व औषधी प्रशासन विभाग आहे. याच विभागात गुरुवारी सायंकाळी अ‍ॅन्टी करप्शन ब्युरोचे म्हणजेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे सहा अधिकारी पोहोचले. त्यांनी सापळा रचला आणि मंत्री झिरवळ यांचा कारकून राजेंद्र ढेरंगे यास अटक केली. गुरुवारी सायंकाळी ६ वाजून ६ मिनिटांनी झालेल्या या कारवाईची कुजबूज वाढली. मंत्रालयातील भ्रष्टाचार दूर व्हावा यासाठी पद्धतशीर प्रयत्न सुरू असताना त्या प्रयत्नांना यश तर आले नाहीच; उलट मंत्री कार्यालयच लाच घेत असल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रदेश काँग्रेसने सोशल मीडियावर या कारवाईचा बभ्रा केला. मात्र, रात्र उलटली तरी लाचलूचपत प्रतिबंधक खात्याने कोणतेही प्रसिद्धीपत्रक जारी केलेले नव्हते.

झिरवाळ यांच्या खात्याचा कारकून राजू तथा राजेंद्र ढेरंगे याच्या पाठोपाठ मंत्र्यांचे पीएस रामदास गाडे यांनाही अटक झाल्याचे वृत्त होते. मात्र पुढारी प्रतिनिधीने थेट गाडे यांनाच संपर्क साधला असता ते दिल्लीत होते. मंत्री झिरवाळ यांच्यासोबत आपण दिल्लीत असून, झालेल्या कारवाईचा आणि आपला संबंध कसा असू शकेल, असा सवाल त्यांनी केला. मात्र, मंत्रालयात झालेल्या कारवाईची बातमी त्यांच्यापर्यंत पोहोचलेली होती आणि तेदेखील अधिक माहिती घेत होते.

दरम्यान, महाभ्रष्ट महायुती सरकारच्या कारकिर्दीत मंत्रालयात खुलेआम लाचखोरी आणि कमिशनखोरी सुरू असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. जनतेची कामे पैशाशिवाय होत नाहीत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, ही अत्यंत गंभीर बाब आहे. मुख्यमंत्र्यांनी संबंधित प्रकरणाची दखल घेऊन जनतेला माहिती द्यावी आणि लाचखोर मंत्र्याला पदावरून हटवावे, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

# पैशांच्या वादातून तरुणाची निर्घृण हत्या

## मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न

### सहा आरोपींसह एक विधीसंघर्षित बालक ताब्यात, अमरावती ग्रामीण पोलिसांची जलद कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अचलपूर:-** पैशांच्या वादातून तरुणाची हत्या करून त्याचा मृतदेह जाळून पुरावा नष्ट करण्याचा धक्कादायक प्रकार पथ्रोट पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आला आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवघ्या काही तासांत गुन्ह्याचा छडा लावत सहा आरोपींना ताब्यात घेतले असून एक विधीसंघर्षित बालकाचाही समावेश आहे.दि. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी वाघडोह येथील पोलीस पाटील सुभाष काकड यांनी वाघडोह-खोडगाव मार्गावरील जहानपूर शेतशिवारातील धरणाच्या कालव्यात जळालेल्या अवस्थेत एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळल्याची माहिती पथ्रोट पोलीस ठाण्यास दिली. त्यानुसार -डख रविंद्र शिंपी यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. कालव्याजवळ चारचाकी वाहनाच्या टायरच्या खुणा आढळून आल्या.अज्ञात आरोपींनी दुसऱ्या ठिकाणी हत्या करून ओळख पटू नये म्हणून मृतदेह येथे आणून जाळल्याचा संशय व्यक्त करत पथ्रोट पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ३२/२०२६ अन्वये भा.न्या.सं. कलम १०३(१), २३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.तांत्रिक तपासातून उलगडागुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व पथ्रोट, अंजनगाव सुर्जी पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले. तांत्रिक पुरावे व गोपनीय माहितीच्या आधारे अंजनगाव सुर्जी येथील पद्मश्री हॉटेलचा मालक शुभम मोहनलाल रॉय याच्यावर संशय व्यक्त करण्यात आला.सखोल चौकशीत शुभम रॉय याने गुन्ह्याची कबुली दिली. मृतक शेख शाहरुख शेख रऊफ याने आरोपी प्रशांत महाजन (रा. आर्वी, जि. वर्धा) याला पैशांच्या कारणावरून मारहाण केल्याचा राग मनात धरून त्याचा खून करण्याचा कट रचण्यात आला होता.प्रशांत महाजन, त्याचा मुलगा टिकेश महाजन व अली अजगर यांनी शेख शाहरुख याला आमिष दाखवून गावाबाहेर नेले आणि मारहाण करून त्याची हत्या केली. त्यानंतर मृतदेह वाहनात टाकून अंजनगाव सुर्जी येथील शुभम रॉय याच्या मदतीने शहानूर धरणाच्या कालव्यात नेऊन जाळण्यात आला. या कृत्यात हॉटेलवरील इतर कर्मचाऱ्यांचीही मदत घेण्यात आली.पोलिसांनी खालील आरोपींना ताब्यात घेतले आहे :टिकेश प्रशांत महाजन (२८, रा. आर्वी, जि. वर्धा)प्रशांत हरीचंद्र महाजन (५९, रा. आर्वी, जि. वर्धा)शुभम मोहनलाल रॉय (२८, रा. अंजनगाव सुर्जी)अली अजगर सब्दर हुसेन (२८, रा. आर्वी, जि. वर्धा)हर्षित प्रकाश गौर (१९, रा. अंजनगाव सुर्जी)निखिल दिपचंद गौर (३२, रा. अंजनगाव सुर्जी)तसेच एक विधीसंघर्षित बालक५.७० लाखांचा मुद्देमाल जप्तआरोपीं कडून गुन्ह्यात वापरलेली पांढऱ्या रंगाची महिंद्रा दणत ५०० (अंदाजे किंमत ५ लाख) व ७ मोबाईल हँडसेट (७० हजार) असा एकूण ५.७० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.वरिष्ठांचे मार्गदर्शनही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व पथ्रोट, अंजनगाव सुर्जी पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली. पुढील तपास पथ्रोट पोलीस करीत आहेत.या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून पैशांच्या किरकोळ वादातून घडलेल्या या निर्घृण हत्येने नागरिकांत संताप व्यक्त होत आहे.

# वाघडोह ग्रामपंचायतीतील अतिक्रमण प्रकरणी सरपंच व पतीवर कारवाईचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अचलपूर-** ग्रामपंचायत वाघडोह येथील शासकीय जमीन व गावठाण क्षेत्रातील अतिक्रमण प्रकरणी पंचायत समिती अचलपूर यांनी गंभीर दखल घेतली असून, संबंधित प्रकरणाची सविस्तर चौकशी करून सरपंच सौ. भाग्यश्री संतोष लंगोटे व त्यांचे पती श्री. संतोष श्यामराव लंगोटे यांच्याविरुद्ध महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमांतर्गत कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत.सुनील मारोती बेलसरे व इतर १२ उपोषणकर्त्यांनी दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पंचायत समिती अचलपूर कार्यालयाने चौकशी प्रक्रिया सुरू केली होती. उपोषणकर्त्यांनी ग्रामपंचायत वाघडोह अंतर्गत शासकीय जमीन व गावठाण क्षेत्रातील अतिक्रमण, रस्ते मोकळे करणे, मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे तसेच संबंधित अतिक्रमणधारकांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.चौकशीदरम्यान असे निदर्शनास आले की, सरपंच सौ. भाग्यश्री संतोष लंगोटे या दिनांक १२ सप्टेंबर २०२३ पासून विद्यमान सरपंच असून, त्यांच्या पती श्री. संतोष लंगोटे यांच्या नावावर असलेल्या मालमत्ता क्रमांक १५७ बाबत अतिक्रमणासंदर्भात गंभीर तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. संबंधित प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी ग्रामपंचायत प्रशासनाने नियमानुसार आवश्यक ती कारवाई न केल्याचा ठपका चौकशी अहवालात ठेवण्यात आला आहे.ग्रामपंचायत अधिकारी व विस्तार अधिकाऱ्यांनी दिलेल्या लेखी जबाबांनुसार, अतिक्रमण काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या; मात्र उपोषणकर्त्यांनी उपोषण मागे घेतले नसल्याचे व अतिक्रमणाबाबत ठोस कार्यवाही न झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच, मालमत्तेचे पुरावे, नोंदी व कर आकारणीसंदर्भातील कागदपत्रे सादर करण्यात अपयश आल्याचेही अहवालात स्पष्ट झाले आहे.या सर्व बाबींचा विचार करता, पंचायत समिती अचलपूरचे गटविकास अधिकारी यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (मुंबई अधिनियम क्रमांक ३) मधील कलम ३९(१) व १४(१)(ज-३) अन्वये संबंधितांविरुद्ध कारवाईचा प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे तातडीने सादर करण्याचे आदेश दिले आहेत.या प्रकरणामुळे वाघडोह ग्रामपंचायत हद्दीतील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पुढील कारवाईकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.अखेर उपोषणकर्त्यांचे शासना कडून समाधान झाल्याने उपोषण मागे घेतले आहे.

# तस्करांनी रस्त्यावरच सांडवली १० ब्रास वाळू; अधिकाऱ्याला धक्काबुक्की



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अंजनगाव सुर्जी** तालुक्यातील वाढत्या वाळू व्यतस्करीविरोधात महसूल विभागाने आज, गुरुवार, १२ फेब्रुवारीच्या पहाटे घाडसी कारवाईचा प्रयत्न केला. परंतु परतवाडा मार्गावरून अंजनगावकडे येणाऱ्या वाळूने भरलेल्या डंपर चालकाने वाहन न यांबक्ता भरधाव वेगात पळ काढला, अडवणूक करणाऱ्या महसूल अधिकाऱ्याला धक्काबुक्कीही करण्यात आली.

भरारी पथकाने तत्काळ पाठलाग सुरू केला. मात्र, चालकाने चालत्या वाहनाचे मागील फाटक उघडून अंदाजे १० ब्रास वाळू रस्त्यावरच सोडवत अकोट रोडने पलायन केले. या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण बाताबरण निर्माण झाले होते. पाठलाग करतानाचा थरारक प्रकार पाहण्यासाठीअनेकांनी गर्दी केली होती. दरम्यान ग्राम महसूल अधिकारी योगेश लंगडे (विहीगाव) यांच्या माहितीनुसार, पहाटे ५.३० वाजता उस्सव नाक्याजवळ भरारी पथक तैनात असताना संशयित डंपर आढळला.वाहन थांबवण्याचा इशारा देऊनही चालकाने त्याकडे दुर्लक्ष केले. पुढे गौमाता दूध डेअरी परिसरात ट्रक थांबवून वाळू वाहतुकीचा पास मागितला असता चालकाकडे कोणतीही वैध परवानगी आढळली नाही. वाहन तहसील कार्यालयात लावण्यास सांगितल्यावर चालकाने महसूल अधिकारी लंगडे यांना धक्काबुक्की करून वाहन पळवून नेले.पाठलागादरम्यान चालकाने मोठ्या प्रमाणात वाळू सांडवल्यामुळे शहानूर पुलापासून ते तहसीलदारांच्या निवासस्थानापर्यंत संपूर्ण रस्त्यावर वाळूचा थर पसरला होता.

### नंबर प्लेटवर ओतले तेल

या प्रकारामुळे मागील वाहनांना अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला होता. घटनेदरम्यान ट्रकसोबत एमएच २७, डीड ५७८५ क्रमांकाची स्विफ्ट कार असल्याचे समोर आले. संबंधित कारचा चालक अविनाश जाधव असल्याची माहिती मिळाली आहे. ट्रक व कारचे मालक प्रज्वल माथनकर व यश राज्गुरे (रा. मोशी) असल्याचे तक्रारीत नमूद आहे. ट्रकच्या नंबर प्लेटवर तेल लावल्यामुळे क्रमांक नोंदवता आला नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन पंचांसमक्ष पंचनामा करण्यात आला. जेसीबीच्या साहाय्याने साडलेली वाळू गोळा करून तो तहसीलदारांच्या तोंडी आदेशानुसारनिवासस्थानासमोर ठेवण्यात आली.

# वाहनाच्या धडकेत वाढोणा येथील सरपंच ठार, एक जण गंभीर

### कुऱ्हा नजिकची घटना




**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३तिवसा** - भरधाव वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने यात धामणगाव रेल्वे तालुक्यातील वाढोणा येथील सरपंच प्रशांत हुडे (वय ५०) यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना गुरूवारी (ता. १२) दुपारी ४ वाजता दरम्यान कुऱ्हा नजिक घडली. यात दुचाकीवर मागे बसून असलेले प्रीतम काळे(वय ४० रा. अंजनसिंगी)हे गंभीर जखमी झाले. सरपंच हुडे हे आपल्या एमएच २७ डीसी ३३६९ या क्रमांकाच्या दुचाकीने कौंडण्यपूरहून कुऱ्हा मार्गे गावी जात होते. यादरम्यान कुऱ्हा गावाच्या नजिक असलेल्या श्रीकृष्ण मंगल कार्यालयाजवळ एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला जबरदस्त धडक दिली. दुचाकी काही अंतरापर्यंत फरफटत गेल्याने त्यांच्या डोक्यासह छातीला गंभीर मार लागला व यातच त्यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच कुऱ्हा पोलीसांनी धाव घेत यातील जखमी काळे यांना तातडीने पुढील उपचारासाठी अमरावती हलविले असून घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.

### तालुक्यात शोककळा

प्रशांत हुडे यांच्या निधनाने त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी आणिदोनपुत्र असा परिवार आहे. एक मनमिळावू, सक्रियवलोकप्रियलोकप्रतिनिधी म्हणूनत्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनामुळे वाढोणा गावासह संपूर्ण तहसील परिसरात तीव्र शोक व्यक्त करण्यात येत आहे.

# राणीगाव शिवारात बिबट्याचा संचार जारी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मेळघाट** धारणी व चिखलदरा तालुक्याच्या सीमेवरील राणीगाव, मोथाखेडा, गोलाई, सिनबन आणि कंजोली गावाच्या पंचक्रोशीत सध्या बिबट्या मुक्तपणे विचरण करत आहे. एका बैलाचा बळी घेतल्यानंतर गावालगतच्या शेतातील जनावरांच्या शोधात बिबट्या फिरत असल्याने नागरिक घाबरलेले आहेत. दुसरीकडे व्याघ्र प्रकल्पाने नागरिक व वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेसाठी सूचना दिल्या आहे.

८ फेब्रुवारीला रात्री राणीगावाजवळच्या कालू सानू जावरकरच्या शेतात बांधलेला बैल बिबट्याने फस्त केल्यानंतर सदर प्राणी पंचक्रोशीत सतत फिरत असल्याचे वारंवार समोर येत आहे. गावकरी घाबरलेले असून व्याघ्र प्रकल्पात चिंता पसरलेली आहे. धारणीपासून ५० कि. मी. अंतरावरील अकोट वन्यजीव विभागातील रेल्वे धुळघाट वनपरिक्षेत्रातील राणीगाव, कंजोली तथा चिखलदरा तालुक्यातील मोथाखेडा व सिनबन गावानजीक बिबट सतत फिरस्तीवर आहे. १० फेब्रुवारीच्या रात्री ९ वाजेदरम्यान नंदलाल भिलावेकर यांच्या शेतातील झोपडीजवळ बिबट्याने बिंदासपणे फेरफटका मारला. नंदलालचे शेत राणीगाव व कंजोली या दोन गावाच्या मधात आहे. झोपडीत एक महिला होती मात्र तिने श्वासोश्वास रोखताना कोणतीही हालचाल केली नाही, हे विशेष. झोपडी जवळच बैल बांधलेले होते. यावेळी मोठी अनहोनी टळल्याने समाधान व्यक्त होत आहे. बिबट्याला रेस्क्यू करुन आदिवासींना सुरक्षित करण्याची मागणी नागरिक करत आहेत. बिबट्याच्या मुक्त संचारामुळे शेतकरी आता शेतात रात्री थांबत नाही पण यामुळे शेतीचे नुकसान होण्याची शक्यता वाढलेली आहे.

### नागरिकांनी सावध राहावे : चक्रे

बिबट सध्या गावानजिकच्या शेतामध्ये फिरत असल्याने उपाययोजना व निगराणी करण्यात येत आहे. लोकांनी सूर्यास्तानंतर जंगलात प्रवेश करु नये तथा शेतात पण राहणे टाळावे, असे आवाहन वनअधिकारी चक्रे यांनी केले आहे. या भागाचे वर्तुळ अधिकारी शाकीर अली यांनी पण नागरिकांना सावध राहण्याची विनंती केलेली आहे. कंजोलीच्या शेतात बिबट्याचे पगमार्क पण स्पष्ट दिसत आहेत. व्याघ्र प्रकल्पाने तात्काळ बिबट्याला पकडावे, अशी मागणी माजी सरपंच रामभाऊ भिलावेकर यांनी केली आहे.

# नोंदणीकृत कामगारांना साहित्याचे वाटप स्थगित

## आजपासून तालुकानिहाय होणार किटचे वाटप

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदणीकृत कामगारांना देण्यात येणाऱ्या गृहपयोगी वस्तू संच, सुरक्षा संच आणि अत्यावश्यक संचाचे वाटप १३ फेब्रुवारीपासून तात्पुरते बंद करण्यात आले आहे. वाटपाच्या ठिकाणी होणारी प्रचंड गर्दी आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेता, जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या आदेशानुसार आता हे वाटप तालुकानिहाय केले जाणार असल्याची माहिती कामगार उप आयुक्त कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

मंडळामार्फत साहित्याचे वाटप सुरळीत होण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करून वेळ दिली जाते. ज्या कामगारांनी २७ फेब्रुवारी या कालावधीत संच मिळण्यासाठी नोंदणी केली होती, अशा ठिकाणी मोठ्या संख्येने कामगारांची गर्दी होऊन गोंधळ निर्माण होत आहे. यामुळे साहित्यासाठी नोंदणी केलेल्या कामगारांना वेळेत संच देणे शक्य होत नाही. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकारी येरेकर यांनी सध्याचे वाटप तात्काळ बंद करून कामगाराला त्यांच्या तालुक्याच्या ठिकाणी दररोज ५०० संच वाटप करण्यात येणार आहे.

# मोर्शी मधील जयस्तंभ चकाकला

## दुरुस्ती करून झाली रंगरंगोटी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती-** मोर्शी शहराला दररोज पाणीपुरवठा, स्थानिक जय स्तंभाची दुरुस्ती करून रंगरंगोटी, स्मशान भूमीची साफसफाई, गावातील अंतर्गत साफसफाई, शहराच्या रोडची मुख्य रस्त्यावर विद्रुपीकरणात भर घालणारे बॅनर्स हटवून रोड दुभाजकामध्ये सुरू करण्यात आलेली तिरंगा लाइटिंग रस्ता दुभाजकामध्ये लावण्यात आलेली झाडे टिकवून ठेवण्याचा संकल्प नगराध्यक्ष प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने यांनी केला आहे. काही दिवसातच ही कामे सुरू करण्यात आल्यामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. मोर्शी शहराला हप्त्यातून दोन दिवसही पाणीपुरवठा होत नव्हतात्यामुळे मोर्शीकर नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागत होता. नांदगाव पेठ ते पांढुर्णा या महामार्गावरील रोड दुभाजकावरील पथदिवे बंद होते. मात्र, आता तिरंगी लाइटिंग लावण्यात आली त्यामुळे रस्त्यावर प्रकाश पडलेला दिसत आहे. शहरातील दुभाजकावर कोणत्याही प्रकारचे बॅनर्स लावू नये असे सुचना फलक नगर परिषदेच्या वतीने लावण्यात आले.

स्वातंत्र्य संग्राम सैनिकाच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या जय स्तंभाच्या टाइल्स निघून विद्रूप अवस्थेत असतांना नव्याने जय स्तंभाची टाइल्स लावून त्यावर सिरीज लाइटिंग लावण्यात आली.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून?

## यंदा नियमात केला महत्त्वाचा बदल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती** अखेर आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून सुरू होण्याची शक्यता आहे. शासनाने प्राथमिक शिक्षण संचालकांना गुरुवारी निर्णयाद्वारे प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यता दिली असली तरी त्यात तारखेचा उल्लेख मात्र केलेला नाही. शासनाच्या आदेशानुसार यंदा प्रती विद्यार्थी १७,६७० रुपये शुल्क शाळांना देण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. पालकांना अर्ज करताना एक किलोमीटरच्या पलीकडील शाळा निवडता येणार नाही, अशी तरतूद प्रणालीमध्ये केली आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांच्या घरापासून एक किमी अंतराच्या मर्यादितच 'गुगल लँडमार्क'वर दर्शवल्यानुसार अर्ज भरता येईल, अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. यंदाच्या प्रवेश प्रक्रियेला दोन महिने विलंब झाला आहे. या संदर्भात सामाजिक संघटना आणि पालकांनी विचारणा केली होती.अखेर गुरुवारी शासनाने प्राथमिक शिक्षण संचलनालयाला शासकीय आदेशाद्वारे प्रवेश प्रक्रिया राबवण्यास मंजुरी दिली.

शासनाकडे आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी विनंती प्रस्ताव पाठवला होता. शासनाने त्याला मंजुरी दिली आहे. १७ फेब्रुवारीपासून प्रवेश प्रक्रिया सुरू होऊ शकते.
**शरद गोसावी,** संचालक, प्राथमिक शिक्षण संचलनालय



### ... तर शाळांना दंड

विनाकारण प्रवेश नाकारल्यास शाळा प्रवेश नाकारतात ही पालकांची तक्रार योग्य असल्यास प्रवेश प्रक्रियेत शाळा दोषी आढळल्यास त्यांच्यावर दंड आकारण्यात येणार आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली वॉर रूमची बैठक

## मेळघाटातील समस्यांवर लक्ष केंद्रित, उपाययोजनांवर चर्चा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–**

जनतेच्या वेळोवेळी उद्भवणाऱ्या अडचणी व समस्यांचे तात्काळ निराकरण करता यावे, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी निवडक विभागप्रमुखांचा समावेश असलेली 'वॉर रूम' गठित केली आहे. या वॉर रूमची बैठक गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी मेळघाटातील विविध प्रश्न आणि त्यांच्यावरील उपाययोजना केंद्रस्थानी होत्या.

महसूल भवन येथे जिल्हाधिकारी येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य डॉ. विभावरी दाणी, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, महावितरणचे उप कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, समाज कल्याण अधिकारी राजेंद्र जाधवर, महिला व बालविकास विभागाचे विलास मरसाळे, मेळघाटातील 'महान' संस्थेचे डॉ. आशिष सातव, चिखलदरा येथील शिवस्फुर्ती प्रोसेसिंग क्लस्टर या संस्थेचे सुनील भालेराव यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

मेळघाट परिक्रमा उपक्रमांतर्गत माहिती, शिक्षण आणि संप्रेषण अभियान राबवण्यासाठी शिवाजी सायन्स कॉलेज सहभाग घेणार आहे. या महाविद्यालयाचे विद्यार्थी मेळघाटात कोरकू भाषेतून पथनाट्ये सादर करतील, तसेच कोरकू बांधवांना समजेल अशा भाषेत संवादसत्र आयोजित करतील. या माध्यमातून आरोग्यविषयक जनजागृती निर्माण केली जाईल.

याशिवाय, मेळघाटात प्रामुख्याने उत्पादित होणाऱ्या कुटकी आणि सावा या मिलेट्स फूड्सबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम राबवला जाईल. मिलेट्स फूडच्या लागवडीखालील क्षेत्र वाढवण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबवण्याचे निर्देश देण्यात आले. हॉटेल्स आणि दैनंदिन जीवनात मशरूम खाद्यान्नांचा वापर वाढल्याने, मशरूमची वाढती मागणी लक्षात घेऊन मशरूम प्रशिक्षण कार्यक्रम राबवण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांना दिले. प्राथमिक कृषी सहकारी संस्था (झ-उड) या ग्रामीण स्तरावरील तळागाळातील सहकारी पतपुरवठा संस्था आहेत. या संस्था थेट शेतकऱ्यांशी निगडित असून खते, बियाणे, कीटकनाशके पुरवणे, अल्प मुदतीचे कर्ज देणे, शेतमाल साठवणूक आणि विक्री यांसारख्या बहुउद्देशीय सेवा पुरवतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणाऱ्या या संस्थांच्या माध्यमातून दोन-तीन गावातील महिलांना एकत्रित करून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी विशेष उपक्रम राबवून त्यांना सहकार्य करण्याचे निर्देश महिला आर्थिक विकास महामंडळ (च-तखच्) तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना यावेळी देण्यात आले.या बैठकीत मेळघाट क्षेत्रातील विद्युत पुरवठ्याचाही आढावा घेण्यात आला. येथील विद्युत पुरवठा अखंडितपणे सुरू राहण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश देण्यात आले.

# सोने-चांदीसह ५.३८ लाखांचा ऐवज लंपास

## घरमालक येताच चोर टॉमी गनसह पळाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदुर बाजार**

ब्राह्मणवाडा थडी पोलिस स्टेशन हद्दीतील बारीपुरा गावात अज्ञात चोराने घरावर निशाना साधत अंदाजे १.५ लाख रुपये रोख रक्कम आणि १० तोळे सोने-चांदीचे दागिने, एकूण ५.३८ लाखांचा ऐवज लंपास केला. तक्रारदाराचे नाव मिथलेसिंग जगदेवसिंग पवार (४४, बारीपुरा, घाटलाडकी) आहे.

तक्रारदाराने पोलिसांना सांगितले की, तोशेतातून संत्री तोडूनघरी परतला तेव्हा बाहेरून कुलूप दिसले नाही, दरवाजा आतून बंद होता. दरवाजा ढकलला तेव्हा



**घाटलाडकीच्या बारीपुरा येथील घटना**

हातात टॉमी गन घेऊन एक अज्ञात व्यक्ती दिसला.आरोपीने तोंडावर मफलर, विंटर कॅप, ब्राऊनजॅकेट, शॉर्ट्स आणि बूटघातले होते. तक्रारदाराने त्याला पकडण्याचा प्रयत्न केला, पण तो घटनास्थळावरून पळून गेला. नंतर, बेडरूममध्ये कपाट अस्ताव्यस्त आढळले. रोख ४०,००० रुपये, २५ ग्रॅमची सोन्याची साखळी, ३४ ग्रॅम वजनाच्या चार सोन्याच्या अंगठ्या, २८ ग्रॅमवजनाच्या सोन्याच्या अंगठ्या आणि २० ग्रॅमचे सोन्याचे ब्रेसलेट चोरीला गेले होते. शिवाय, दुसऱ्या खोलीतील गोदरेज कपाटातून १,२०,००० रुपये रोख, १०० ग्रॅम चांदीची लक्ष्मीची मूर्ती आणि १०० ग्रॅम चांदीचीप्लेट चोरीला गेली. चोर एकूण ५,३८,००० रुपयांच्या रोख आणि सोन्या-चांदीच्या वस्तू घेऊन पळाला.

# चपराशीपुरा परिसरात स्वच्छता मोहीम

## १६ आस्थापनांची तपासणी, ३,००० दंड वसूल



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती,** अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांच्या आदेशानुसार तसेच वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव व सहाय्यक आयुक्त झोन क्र. ३ यांच्या मार्गदर्शनाखाली झोन क्र. ३ अंतर्गत दस्तुरनगर परिसरातील चपराशीपुरा चौक येथे विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.या मोहिमेत प्लास्टिक जप्ती, डस्टबिन तपासणी तसेच हॉटेल वेस्ट व्यवस्थापनाबाबत विशेष लक्ष देण्यात आले. एकूण १६ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून त्यामध्ये हॉटेल, कॅन्टीन, बार, मेस, डेअरी व रेस्टॉरंटचा समावेश होता. बहुतांश आस्थापनधारकांकडून डस्टबिनचा योग्य वापर केला जात असल्याचे निदर्शनास आले.तपासणीदरम्यान अनेक ठिकाणी कापडी व कागदी पिशव्या तसेच ५१ मायक्रोनपेक्षा अधिक जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर होत असल्याचे आढळले.मात्र तीन आस्थापनांमध्ये डस्टबिनचा वापर न करता इतरत्र कचरा टाकण्यात आल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर कारवाई करण्यात आली. जावेद खान, कॅम्प कॉर्नर आणि सुधाकर नागाशे यांना प्रत्येकी १,००० प्रमाणे एकूण ३,००० दंड वसूल करण्यात आला.या मोहिमेत प्लास्टिक नोडल अधिकारी विनोद टांक, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक सचिन सैनी, प्रसाद कुलकर्णी, मनीष नकवाल, मोहित जाधव, निलेश तंबोले आणि संजय माहुरकर उपस्थित होते. महानगरपालिकेने पुढेही अशा प्रकारच्या तपासणी मोहिमा नियमितपणे राबविण्याचा इशारा दिला आहे.

# विविध राज्यस्तरीय सामाजिक पुरस्कारांसाठी प्रस्ताव देण्याची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती–** महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध राज्यस्तरीय पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. यामध्ये महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार आणि क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कारांचा समावेश असून, इच्छुकांनी २१ फेब्रुवारी पर्यंत आपले प्रस्ताव सादर करावेत. सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस पत्रे व प्रमाणपत्रे जोडणे आवश्य, असे आवाहन सहायक संचालक सरिता बोबडे यांनी केले आहे.

व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्र या पुरस्कारांसाठी अर्जदार राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य उत्थानासाठी त्रातील उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य सलग आणि केलेले असावे. पुरस्कारासाठीचा अर्ज विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक असून, त्यासोबत शासन निर्णयातील क आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले किंवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.पुरस्काराबाबतचा अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. पात्र व इच्छुक व्यक्तींनी आपले प्रस्ताव २१ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहायक संचालक, इतर अमरावती' यांच्या कार्यालयात मागास बहुजन कल्याण, सादर करावेत. अर्जाचा नमुना आणि सविस्तर अटी व शर्तींची माहिती जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहे, तरी जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# 'अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्सपो'च्या अधिकृत लोगोचे अनावरण

## प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आगामी १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परळी वैजनाथ (जि. बीड) येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक अखिल भारतीय पशु-पक्षी महा पशुधन एक्सपो २०२६ या प्रदर्शनाच्या अधिकृत लोगोचे अनावरण आज जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर व अर्पित चौहान यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले.

यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. तुषार बावणे, पशुसंवर्धनसहाय्यक आयुक्त डॉ. विलास पावडे, डॉ. राजेश निचळ तसेच इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. लोगो अनावरणानंतर संवाद साधताना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर म्हणाले की, पशुपालन हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. परळी वैजनाथ येथे होणारे हे प्रदर्शन देशातील जातिवंत पशुधन व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम ठरणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसायातील जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान एकाच ठिकाणी पाहण्याची संधी मिळणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पशुपालक, तरुण उद्योजक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट देऊन आपले ज्ञान व उत्पन्न वाढवावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यासाठीसंपूर्ण जिल्ह्यात प्रदर्शनाची व्यापक प्रसिद्धी मोहीम राबविण्यात येणार असून, सोशल मीडियाच्या माध्यमातूनही नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्याचे नियोजन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व पशुपालकांनी व शेतकरी बांधवांनी या महोत्सवात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले.

# राज्यातील ९०० बोगस दिव्यांग संस्थांची नोंदणी रद्द

## IAS अधिकारी तुकाराम मुंढेंची धडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई–** राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाने गेल्या १३ वर्षात नियमबाह्य काम करणाऱ्या तब्बल ९०० दिव्यांग कल्याण संस्थांची नोंदणी रद्द केली असून त्यातील ३६३ संस्थांवर गेल्या वर्षभरात अशी कारवाई करण्यात आली. कारवाईचा बडगा पुढेही सुरू राहील, असे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे.

नोंदणी रद्द करण्यात आलेल्या दिव्यांग कल्याण संस्थांपैकी ज्यांनी राज्य सरकारकडून अनुदान घेतले, त्याचा विनियोग त्यांनी कसा केला, अनुदान घेत असतानाच्या काळात झालेल्या अनियमितताही आता चौकशीच्या रडारवर येण्याची शक्यता आहे. तुकाराम मुंढे हे ऑगस्ट २०२५ मध्ये विभागाचे सचिव झाले. ३६३ संस्थांपैकी बहुतेक संस्थांची नोंदणी त्यांच्या सचिवपदाच्या काळातच रद्द करण्यात आली आहे. राज्यात दिव्यांग व्यक्ती अधिनियम अंतर्गत दिव्यांगासाठी कार्यरत संस्थांना दिव्यांग कल्याण आयुक्त यांच्याकडे नोंदणी असणे अनिवार्य आहे.

संस्था दिव्यांग क्षेत्रात कार्यरत आहेत किंवा कार्य करू इच्छितात त्यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. अशा सर्व संस्थांनी २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत https://divyangkalyan.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर नोंदणी पूर्ण करणे आवश्यक आहे. नोंदणी न केल्यास



> नियमबाह्य काम करणाऱ्या संस्थांवर अपात्रतेची कारवाई पुढेदेखील होत राहील. ज्या उद्देशांसाठी संस्थेला नोंदणी देण्यात आली त्या उद्देशांचे पालन होत नसेल तर अपात्रता ही करावीच लागेल. नोंदणीशिवाय चालणाऱ्या संस्था बंदच केल्या जातील.
>
> **– तुकाराम मुंढे, सचिव, दिव्यांग कल्याण विभाग.**

संबंधित संस्थांवर अधिनियमातील कलम ९१ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे मुंढे यांनी स्पष्ट केले आहे. संस्थानी नोंदणी केल्यामुळे त्यांच्यामार्फत दिव्यांग व्यक्तींचे सक्षमीकरण आणि पुनर्वसन करणे शक्य होईल. हे कार्य करताना दिव्यांगांच्या हक्कांचे, अधिकारांचे उल्लंघन होणार नाही आणि त्यांना न्याय दिला जाईल याबाबत दक्षता घेतली जाईल.

**नोंदणी का रद्द करण्यात आली?–** काही संस्थांनी प्रत्यक्ष जेवढे विद्यार्थी रेकॉर्डवर दाखविलेले होते; प्रत्यक्षात तेवढे विद्यार्थी संस्थेत नव्हतेच. कायद्यानुसार या संस्थांनी दिव्यांगांना ज्या सवलती द्यायला हव्यात त्या दिल्याच नाहीत, फक्त कागदावर दाखविल्या. दिव्यांग संस्थांसाठी असलेल्या कायद्याचे सर्रास उल्लंघन करण्यात आले. कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन दिले नाही, पण वेतन अनुदान सरकारकडून लाटले. संस्थेच्या संचालक मंडळातील अंतर्गत वादाचा फटका संस्थेला आणि कर्मचाऱ्यांनाही बसला.

# भारुडाच्या माध्यमातून कुष्ठरोग, क्षयरोग जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१३अमरावती**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान व राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत जनुना ग्रामपंचायत येथे आरोग्य प्रबोधनाचा जागर करण्यात आला. या कार्यक्रमात आरोग्य सेवक राजेंद्र चकुले यांनी गावातील वृद्ध महिलांसोबत भारुड सादर केले. या माध्यमातून कुष्ठरोग आणि क्षयरोगाविषयी संदेश देण्यात आला. यावेळी सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. पूनम मोहोकार यांनी शास्त्रीय माहिती देत, कुष्ठरोग हा शाप नसून तो पूर्णपणे बरा होणारा आजार असल्याचे सांगितले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्राजक्ता वानखडे यांनी आरोग्य विभागाच्या शिविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमात भारुड आणि भजनासोबतच अभिनय हायस्कूलच्या निबंध स्पर्धा विजेत्यांचा आणि रांगोळी कलाकारांचा सन्मान करण्यात आला. पर्यावरणाचा संदेश देण्यासाठी महिलांना झाडांच्या कुंड्यांचे वाटप करण्यात आले. सरपंच जगदीश नरखेडकर व ग्रामसेवक जयश्री काकडे यांच्या नियोजनाखाली पार पडलेल्या या मेळाव्यात, लवकर निदान आणि त्वरित उपचार या सूत्राद्वारे गाव कुष्ठरोग व क्षयरोगमुक्त करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी यावेळी व्यक्त केला.

# अमरावतीत फिशरीज हब प्रकल्पासाठी पाहणी दौरा

## तांत्रिक मार्गदर्शन व नियोजनावर सविस्तर चर्चा, अमरावतीत आधुनिक फिशरीज हब उभारणीसाठी प्रशासन सज्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

अमरावती येथे प्रस्तावित फिशरीज हब प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यानंतर प्रकल्पाच्या विविध तांत्रिक, प्रशासकीय व व्यवस्थापन विषयक बाबींचा सखोल आढावा घेण्यासाठी विस्तृत बैठक आयोजित करण्यात आली.सदर पाहणीदरम्यान प्रकल्पासाठी निवडलेल्या जागेची सद्यस्थिती, उपलब्ध पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा व्यवस्था, वीजपुरवठा, साठवण क्षमता, वाहतूक सुलभता तसेच भविष्यातील विस्ताराची शक्यता आदी मुद्द्यांचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. तज्ज्ञ अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मार्गदर्शन घेऊन प्रकल्प कार्यान्वयनाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी कशी करावी, याबाबत दिशा निश्चित करण्यात आली.बैठकीत अमरावतीसह संबंधित जिल्ह्यांतील मत्स्य उत्पादन क्षमता, उपलब्ध जलस्रोत, मासेमारी करणाऱ्या सहकारी संस्था व संघटनांची संख्या, तसेच बाजारपेठेतील मागणी यांचा आढावा घेण्यात आला. फिशरीज हब प्रकल्पामुळे मत्स्य साठवण, प्रक्रिया, पॅकिंग व



विक्री व्यवस्थेत सुसूत्रता येऊन मत्स्य व्यवसायाला चालना मिळणार असल्याचे नमूद करण्यात आले.प्रकल्पाच्या प्रभावी संचालनासाठी मासेमारी संघटना, सहकारी संस्था व व्यापारी प्रतिनिधी यांचा समन्वय आवश्यक असून, त्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती व नियोजन आराखडा तयार करण्याबाबत चर्चा झाली. शुक्रवार बाजार येथील मार्केट परिसरात मासेमारी संघटना/संस्था यांचे शिस्तबद्ध व नियोजनबद्ध व्यवस्थापन कसे करावे, वाहतूक व स्वच्छता व्यवस्थापन कसे सक्षम करावे, यासंदर्भातही सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.फिशरीज हब प्रकल्पासाठी दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेल्या पाण्याचे नियोजन, साठवण व्यवस्था, स्वच्छता मानके व आरोग्यविषयक नियमांचे पालन याबाबत विशेष चर्चा करण्यात आली. मत्स्य उत्पादनाच्या गुणवत्तेचे जतन व ग्राहकांना स्वच्छ व दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून देणे हा प्रकल्पाचा मुख्य उद्देश असल्याचे अधोरेखित करण्यात आले.या पाहणी दौऱ्यास व बैठकीस मा. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, शहर अभियंता रविंद्र पवार, कार्यशाळा विभाग प्रमुख, हिम्मत फिश मर्चेंट अँड यवतमाळ यांचे प्रतिनिधी, न.या. पिंगलवार (स.म.वि.अ., यवतमाळ), उत्कर्ष सुरेंद्र चाचरकर (म.वि.अ., बुलढाणा), विक्रम कच्छवे (सहाय्यक आयुक्त मत्स्य, बुलढाणा), एम.एम. मेश्राम (सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, अमरावती), प्रियंका झाडे (सहाय्यक आयुक्त मत्स्य व्यवसाय, वाशीम), सु. वा. जांभुळे (प्रादेशिक उपायुक्त मत्स्यव्यवसाय, अमरावती), डॉ. सचिन बोंद्रे (नोडल अधिकारी, फिशरीज हब, महानगरपालिका), वाघमोडे धों. म. (प्रादेशिक उपायुक्त मत्स्य, अमरावती), डॉ. भूषण सानप (सहाय्यक मत्स्य विकास अधिकारी) तसेच इतर संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.फिशरीज हब प्रकल्पाच्या माध्यमातून अमरावती व परिसरातील मत्स्य व्यवसायाला आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार असून, मत्स्य उत्पादन वाढ, रोजगारनिर्मिती, स्थानिक बाजारपेठेचा विकास व अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मोठी मदत होणार आहे. प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करण्यासाठी संबंधित विभागांनी आवश्यक ती कार्यवाही गतीमान करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

# आमला विश्वेश्वरची कोट्यवधींची पाणीपुरवठा योजना ठप्प

## चौकशीअंती दोषींवर कारवाईची ग्रामस्थांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३चांदूर रेल्वे**

राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत आमला विश्वेश्वर येथे उभारण्यात आलेली कोट्यवधींची नळ पाणीपुरवठा योजना पूर्ण होऊनही अद्याप सुरू न झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. निकृष्ट दर्जाचे काम व कमी प्रतीचे पाईप वापरल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.



आमला विश्वेश्वर येथे गव्हा फरकाडे ते आमला विश्वेश्वर नळ पाणीपुरवठा योजना सन २०१९ मध्ये मंजूर होऊन २०२३ मध्ये पूर्ण करण्यात आली. या योजनेसाठी १ कोटी ३९ लाख ५१ हजार २०८ रुपये खर्च करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात ही योजना सुरळीत सुरूच झाली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. गावाच्या पाण्याच्या टाकीपर्यंत पाणी पोहोचत नसून, पुरवठा सुरू करताच पाईप फुटत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दुरुस्तीसाठी सुमारे १२ लाख रुपये खर्च करूनही योजना अद्याप बंदच आहे. त्यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम आहे.या पार्श्वभूमीवर सानप कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकून संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करावी, अपहाराची रक्कम वसूल करून फौजदारी गुन्हा दाखल करावा, अन्यथा चांदूर रेल्वे येथील एसडीओ कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

१) या योजनेचे पाणी अद्याप टाकीवर गेलेले नाही. योजना सुरू केल्यानंतर एका दिवसातच पाईप फुटून पुरवठा बंद पडतो. गावातील जुन्या पाणीपुरवठा विहिरीत या योजनेचे पाणी सोडले तरी पाईप फुटतात. त्यामुळे तीन महिने ट्रायल घेतल्याचा दावा खोटा असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. इस्टीमेट व कराराप्रमाणे काम न झाल्याने शासनाचा कोट्यवधींचा खर्च वाया गेल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

२) योजनेतील पंपिंग व्यवस्था, उर्ध्वनलिका पाईपची गुणवत्ता व संपूर्ण कामाची सक्षम विभागामार्फत पंचासमक्ष तपासणी करावी. दोषींवर कारवाई करून योजना हस्तांतरित करणाऱ्या अधिकारी व पदाधिकाऱ्यांना बडतर्फ करावे. अपहाराची रक्कम वसूल करून फौजदारी गुन्हा दाखल करावा. तसेच निकृष्ट काम करणाऱ्या ओ.बी. कन्स्ट्रक्शन कंपनीला काळ्या यादीत टाकावे अशी सुध्दा ग्रामस्थांची मागणी आहे.

३) सदर कामाची प्रत्यक्ष तपासणी करण्यात आली असून सुमारे दीड किलोमीटर भागात भौगोलिकदृष्ट्या वर-खाली उतार असल्याने पाईपलाईन फुटत आहे. संबंधित काम इस्टीमेटमध्ये समाविष्ट केले असून मंजुरीनंतर ते पूर्ण करण्यात येईल, असे कनिष्ठ अभियंता तुषार कठाळे (जि.प. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभाग, चांदूर रेल्वे) यांनी सांगितले.

# दुबार, मृत मतदार शोधण्यासाठी 'डीएसई' ॲक्शन मोडवर

## निवडणूक विभागाची जिल्हाभरात मोहीम : २५.४६ लाख मतदारांपैकी ४३ टक्के मतदारांचे ऑफलाइन मॅपिंग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

मतदारयाद्यांमधील दुबार, मृत किंवा स्थलांतरितांची नावे शोधून ती वगळण्याच्या अनुषंगाने जिल्ह्यात 'डेमॉग्राफीक सिमिलर एंट्रीज' (डीएसई) प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, विधानसभा २०२४ च्या मतदारयादीनुसार जिल्ह्यातील २५ लाख ४६ हजार ४५८ मतदारांची नावे तपासल्या जात आहे.



मतदारयादी पुनर्रि क्षण (एसआयआर) कार्यक्रम आगामी काळात राज्यात लागू होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडूनही पूर्वतयारी सुरू आहे. यापूर्वी २००२ मध्ये एसआयआर झाले होते. त्या यादीची आता २०२४ च्या मतदारयादीसोबत मॅपिंग केले जात आहे. जिल्ह्यातील २५ दरम्यान, लाख ४६ हजार ४५८ मतदारांपैकी ४३.८७ टक्के ऑफलाइन मॅपिंग झाले असून, यातील ३४.३४ टक्के माहिती संबंधित पोर्टलवर ऑनलाइन करण्यात आली आहे. प्रत्येक निवडणुकीत सातत्याने दुबार मतदारांच्या नावाने गोंधळ होतो. त्यामुळे एसआयआर म्हणजेच ढोबळमानाने मतदारयाद्यांचे पूर्णतः शुद्धीकरण केल्या जात असल्याचादावा शासन व प्रशासनाकडून केल्या जात आहे. यासाठी संबंधित मतदारांशी संपर्क साधून त्यांच्याकडून = हमीपत्र घेणे, निवडणूक विभागाला त्याबाबत माहिती देणे, याबाबतची जबाबदारी स्थानिक पातळीवरील बीएलओंवर सोपविण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा निवडणूक विभागातील नायब तहसीलदार प्रवीण देशमुख यांनी दिली.

### ४४ हजार मतदारांचे नाव किंवा छायाचित्रात सारखेपणा

दोन वेगवेगळ्या मतदारांच्या नावांत सारखेपणा असणे, एकाच मतदारांचे छायाचित्र एकापेक्षा अधिक ठिकाणी असणे, एकाच मतदारसंघात किंवा विभिन्न मतदारसंघांत वेगवेगळ्या ठिकाणी एकाच मतदाराचे नाव असणे, यासारख्या मुद्यांच्या आधारे भतदारयाद्यांची तपासणी सुरू आहे. ३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत या प्रकारात ४४ हजार ६४१ मतदार आढळून आले असून, त्यांची माहिती ऑनलाइन करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# कपाशी-तुरीचे भाव कोसळले; केंद्र सरकारच्या ट्रेड कराराची ग्रामीण भागात चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नेरपिंगलाई**

कपाशी आणि तूर या पिकांचे दर काही आठवड्यांपूर्वी वाढले असताना, केंद्र सरकारच्या भारत-अमेरिका ट्रेड डिल आणि शून्य टक्के टॅरिफ लावून आयात करण्याच्या चर्चेमुळे बाजारपेठेत अचानक उलट चित्र दिसू लागले आहे. या चर्चेचा थेट परिणाम म्हणून गेल्या काही दिवसांत कपाशी व तुरीचे भाव झपाट्याने घसरू लागले असून, शेतकरी वर्गात मोठी चिंता निर्माण झाली आहे.



व्यापारी आणि बाजारतज्ज्ञांच्या मते, शून्य टक्के टॅरिफमुळे अमेरिकेचा शेतमाल मोठ्याप्रमाणावर भारतात आयात होण्याची शक्यता आहे. या केवळ शक्यतेमुळेच बाजारात मागणी कमी झाली असून, व्यापाऱ्यांनी खरेदीला ब्रेक लावल्याचे दिसूनयेत आहे. परिणामी, काही आठवड्यांपूर्वी तेजीमध्ये असलेले दर सध्या दबावाखाली आले आहेत.भारतीय शेतकरी अमेरिकेतील शेतकऱ्यांशी थेट स्पर्धा करू शकत नाही, अशी स्पष्ट भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. अमेरिकन शेतकऱ्यांना मोठी सरकारी अनुदाने, अत्याधुनिक यंत्रसामग्री, स्वस्त कर्ज आणि मजबूत बाजारव्यवस्था उपलब्ध आहे. त्याउलट भारतीय शेतकरी वाढते उत्पादन खर्च, महागडी खते-बियाणे, कर्जबाजारीपणा आणि अस्थिर बाजारभाव यांचा सामना करत आहे. अशा परिस्थितीत सवलतीच्या दरात किंवा शून्य टॅरिफवर आयात झाल्यास देशांतर्गत शेतमालाच्या किमती टिकणे कठीण होणार, अशी भीती व्यक्त केली जात आहे.कपाशीच्या बाबतीत आयात वाढण्याचे संकेत आधीच मिळत असून, तुरीच्या बाजारातही आयातीच्या अंदाजामुळे दर नरमले आहेत. उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळणारा दर अपुरा ठरत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडत असल्याचे चित्र आहे.या घडामोडींवर शेतकरी संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ट्रेड डिल आणि टॅरिफ करार करताना शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केला जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. केंद्र सरकारने आयात धोरणाबाबत तातडीने स्पष्ट भूमिका मांडावी, किमान आधारभूत किंमत प्रभावीपणे राबवावी आणि बाजारात हस्तक्षेप करून कपाशी व तुरीचे दर सावरण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून पुढे येत आहे.

# महामार्गावरील 'स्पीड ब्रेकर' वाहनचालकांसाठी ठरले नवे संकट

## परतवाडा ते अंजनगाव महामार्ग बनला धोकादायक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अंजनगाव**

अचलपूर सध्या अपघाताच्या मालिकेमुळे परतवाडा ते अंजनगाव हा महामार्ग मृत्यूचा सापळा ठरल्याची भावना अनेकाच्या मनात निर्माण झाली आहे त्यामुळे अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी संबंधित विभागाने अपघातप्रवण स्थळी स्पीड ब्रेकर्स टाकलेले आहे केवळ टाकून ठेवलेल्या ज्यादा उंचीच्या ब्रेकर्सवर अद्यापही पांढरे पट्टे वा तत्सम उपायोजना केलेली नाही त्यामुळे वेगात येणाऱ्या प्रवासी बसेस, ट्रक, कार आणि दुचाकी या सर्वच वाहन चालकांच्या दृष्टीपथात सदर ब्रेकर्स पडत नसल्याने वाहनधारकांसाठी सदर ब्रेकर्स नवे संकट ठरले आहे.परतवाडा ते अंजनगाव या महामार्गाचे बांधकाम करण्यात आले आहे. हा महामार्ग खड्डेमुक्त असल्यामुळे आणि रस्त्याची रुंदी जास्त असल्यामुळे वाहने वेगात धावताना दिसून येते. बऱ्याचदा वाहने अनियंत्रित झाल्यामुळे निष्पाप नागरिकांचा नाहक बळी गेला अपघात झालेले आहेत. त्यामध्ये अनेक प्रसिद्धी माध्यमांमध्ये आणि समाज माध्यमामध्ये या अपघाताच्या बातम्या सर्वत्र प्रसारित होत असतानाच या महामार्गावर होत असलेले अपघात प्रशासनासाठी फार मोठी डोकेदुखी ठरू लागली. यासंदर्भात प्रशासनाच्च्या संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकींचे सत्र सुरू झाले. त्याची फलश्रुती म्हणजे या मार्गावर ठिकठिकाणी भव्य असे ब्रेकर टाकून वेगाला आवर घालण्याचा प्रयत्न करण्यात आला.याबाबत प्रामुख्याने बसमध्ये प्रवास करणाऱ्या महिला पुरुषांना हा वाईट अनुभव दैनंदिन येत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने ज्या तत्परतेने जागोजागी ब्रेकर्स तयार केले, त्याच प्रकारे ब्रेकर्सबाबत तत्काळ उपाययोजना कराव्या, अशी मागणी या मार्गाने प्रवास करणाऱ्या अनेक प्रवाशांनी केली आहे.



सदर ब्रेकर्स टाकत असतानाच भरधाव धावणाऱ्या वाहनचालकाच्या दृष्टीपथात सदर ब्रेकर्स पडावे, यासाठी त्या ठिकाणी तत्काळ पांढरे पट्टे, चमकणारे पत्रे आणि रस्त्याच्या कडेला फलक लावणे गरजेचे ठरतेः मात्र ब्रेकर तयार होऊन काही दिवसांचा कालावधी उलटला तरी अद्यापही संबंधित विभागाने अद्याप कुठल्याच हालचाली केलेल्या नाही. त्यामुळे या महामार्गावर भरधाव वाहनांचे दळणवळण होत असताना वाहने हवेत उसळत आहे. कारण बसमधले प्रवासी प्रवास करताना नेहमीच सतर्क नसतात. त्यामुळे एसटी बसेस, खाजगी बसेस, कार आणि दुचाकी चालवणाऱ्या प्रवाशांना मोठे झटके बसून शारीरिक दुखापती होत आहेत.

# सिध्द कृपाश्रम हंतोडा येथे १०८ शिवलिंगाचे दर्शन;महाशिवरात्री निमित्त आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अंजनगाव सुर्जी**

तालुक्यातील हंतोडा येथील सिध्द कृपाश्रम या ठिकाणी १५ २०२६ ला फेब्रुवारी महाशिवरात्रीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही १०८ शिवलिंगांचा दर्शन सोहळा आयोजित केला आहे. सिद्ध कृपाश्रमामध्ये सिद्धेश्वराची १२ फुटांची सिद्धमूर्ती, तसेच १०८ सिद्ध शिवलिंगांची स्थापना केली आहे. सिद्ध शनिदेव मंदिर, सिद्धेश्वराची सिद्धपरंपरा मंदिर, सिद्ध शिष, गजानन महाराज मंदिर, नवनाथ मंदिर आदींचे दर्शन एकाच ठिकाणी भाविक भक्तांना होणार आहे.स्वामी हरदास महाराज यानी हंतोडा गावाजवळ सिध्द कृपाश्रमाची स्थापना केली आहे. या ठिकाणी विशेष सिद्ध पद्धतीने साधना करुन सिद्धांची कृपा प्राप्त करुन घेता येते. कारण सिद्ध साधना या सिद्ध शक्तियुक्त असल्यामुळे त्वरित फलदायी असून आचरणास अत्यंत सोप्या आहेत. महाशिवरात्रीनिमित्त सिद्ध कृपाश्रम येथे आयोजित कार्यक्रमात भाविक भक्तांनी तसेच स्थानिक नागरिकांनी या १०८ शिवलिगांच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजक धीरज जयस्वाल यांनी केले आहे.

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि बातम्यांसाठी
संपर्क करा 8605948853

# गुरुदेवनगरमध्ये अतिक्रमण हटविण्यावरून वाद पेटला

## श्रीराम नगरमधील पाच कुटुंबांच्या घरांवर कारवाईचा प्रयत्न सामाजिक कार्यकर्त्यांची विभागीय आयुक्तांकडे धाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३तिवसा**

तिवसा तालुक्यातील गुरुदेव नगर ग्रामपंचायत हद्दीत सर्वे क्रमांक २६ व २७ या ई-क्लास जमिनीवर मागील १५ ते २० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या श्रीराम नगर वस्तीतील पाच कुटुंबांची घरे तोडण्याचा प्रयत्न ग्रामपंचायतीकडून सुरू असल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्त्या जया मेहरा यांनी विभागीय आयुक्त कार्यालयात धडक देत गोरगरीब नागरिकांवर अन्याय होऊ नये, अशी मागणी केली आहे.

श्रीराम नगर ही वस्ती संपूर्णपणे अतिक्रमित जमिनीवर उभारलेली असून अनेक कुटुंबे झोपड्यांमध्ये राहून आपला उदरनिर्वाह करत आहेत.यापैकी शारदा प्रकाश सोनकांबळे, निर्मला विलास लांजेवार, कांता सुनीलराऊत, चंदा राजेंद्र शिंदे आणि गुलशन शफीक अन्सारी या पाच नागरिकांना ग्रामपंचायतीने नोटीस बजावून जागा खाली करण्याचे आदेश दिले आहेत. सरपंचांच्या निर्देशानुसार अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे.मात्र संबंधित कुटुंबे मागील अनेकवर्षांपासून येथे राहत असून त्यांच्यानिवाऱ्याचा प्रश्न गंभीर असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या जया राजेश मेहरा यांनी उपायुक्त लहाने यांच्यासमोर मांडले. 'गोरगरीब नागरिकांची घरे उद्ध्वस्त करण्याऐवजी पुनर्वसनाचा पर्याय द्यावा. तत्काळ अतिक्रमण हटविण्याची कारवाई थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली. या निवेदनाची दखल घेत उपायुक्त लहाने यांनी संबंधित प्रकरणाची माहिती घेऊन योग्य तो - निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याचे समजते. दरम्यान अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईमुळे श्रीराम नगर परिसरात अस्वस्थता पसरली असून प्रशासन पुढे कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्षलागले आहे.

# चांदूर बाजार येथे नोंदणी विभागाचा जनसंवाद; तक्रारींचे जागेवर निराकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

नोंदणी व मुद्रांक विभाग, अमरावती तर्फे चांदूर बाजार येथे तालुकास्तरीय जनसंवाद व जनता दरबार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार प्रवीण तायडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर उपस्थित होते. तसेच दुय्यम निबंधक अधिकारी प्रिया चक्रे व तालुक्यातील विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निर्देशानुसार तुकडेबंदी नियमितीकरण अंतर्गत दस्त नोंदणी कार्यपद्धती प्रभावीपणे राबविणे तसेच नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला.मुंबई धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम



१९४७ अंतर्गत अधिसूचना व एसओपीच्या अनुषंगाने नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक तक्रारी, प्रलंबित प्रस्ताव, विविध विकासकामांची सद्यस्थिती आणि स्थानिक प्रश्नांचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला.आमदार प्रवीण तायडे यांनी तुकडेबंदी कायद्याचा लाभ सामान्य नागरिकांना होणार असून जनता दरबारामुळे रखडलेली कामे मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला. शासन जनतेच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असेही त्यांनी नमूद केले.सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांनी तुकडेबंदी कायद्याबाबत जनतेच्या मनातील गैरसमज दूर करणे हेच या जनसंवादाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. प्रशासन नेहमीच नागरिकांच्या सोबत असून नोंदणी व मुद्रांक विभाग सर्वतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.या जनसंवाद कार्यक्रमात अनेक नागरिकांच्या अडचणी व तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यात आले. त्यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये समाधानाची भावना दिसून आली. एकूणच हा कार्यक्रम जनतेला दिलासा देणारा ठरला.

# 'टक्केवारीचे सरकार'; नरहरी झिरवाळांना बदनाम करण्याचे भाजपचे षड्यंत्र? - यशोमती ठाकूर यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

कॅबिनेट मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात एसीबीने छापा टाकून एका कर्मचाऱ्याला ५० हजार रुपये स्वीकारताना रंगेहात पकडल्याच्या प्रकरणावर काँग्रेस नेत्या तथा माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. हे प्रकरण मंत्री नरहरी झिरवाळ यांना बदनाम करण्यासाठी भाजपचे षड्यंत्र असू शकते, असा खळबळजनक दावा त्यांनी केला.यावेळी बोलताना ठाकूर म्हणाल्या, सध्या मंत्रालयात कुठल्याही कार्यालयात जा, टक्केवारीचाच हिशोब सुरू आहे. प्रत्येक मंत्र्यांच्या कार्यालयात टक्केवारी मागितली जाते, हे आता उघड झाले आहे. त्यामुळे हे 'टक्केवारीचे सरकार' आहे, अशी तीव्र टीका त्यांनी केली.



**'राहुल गांधींची एवढी भीती का?' हुकूमशाहीकडे वाटचाल असल्याचा आरोप**

दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी केल्याच्या पार्श्वभूमीवरही ठाकूर यांनी भाजपवर निशाणा साधला.दुबे यांसारख्या व्यक्तीचा प्रस्ताव मंजूर होत असेल, तर देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत आहे, असे म्हणावे लागेल. भाजपला राहुल गांधी यांची एवढी भीती का वाटते? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.ठाकूर यांनी पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरही टीका करत, स्वतःला विश्वगुरू म्हणवून घेणारे पंतप्रधान साधी पत्रकार परिषद घेऊ शकत नाहीत. महिलांच्या आड लपण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप केला.तसेच 'एपस्टीन फाईल' संदर्भात भाजप नेते हरदीप सिंह पुरी यांचे नाव आल्याचा दावा करत त्यांचा राजीनामा का घेतला जात नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.एकूणच, ठाकूर यांच्या या वक्तव्यांमुळे राज्याच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

# एसटी महामंडळाकडून आता सवलतधारकांसाठी 'एनसीएमसी' स्मार्ट; कार्ड रिचार्जचीही व्यवस्था



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आता सवलतधारक प्रवाशांसाठी 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी प्रवासाच्या सवलतींचा लाभ घेण्यासाठी यापुढे हे स्मार्ट कार्ड अनिवार्य राहणार असून कार्ड मिळवण्यासाठी महामंडळाने तीन हजारांवर एजंट नियुक्त केल्याची माहिती आहे.

रोख व्यवहारांच्या चौकटीपलीकडे जाऊन पारदर्शक, सुरक्षित आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या उद्देशाने ही प्रणाली सुरू करण्यात येणार असल्याचे महामंडळाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. सवलतींची अचूक नोंद, पारदर्शक प्रतिपूर्ती आणि रोखविरहित व्यवहार या तिन्ही बाबी एका स्मार्ट कार्डच्या माध्यमातून एकत्रित केल्या जाणार असल्याचा दावा अधिकारी करीत आहेत. ही योजना पूर्ण करण्यासाठी महामंडळाने मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्याशी करार केला आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व आगारांमध्ये या कार्डसाठी नोंदणी सुरू केली जाणार आहे. एनसीएमसी कार्ड १९९ रुपयांत दिले जाणार असून जुने स्मार्ट कार्ड जमा केल्यास १४९ रुपयांत नवीन कार्ड दिले जाईल. याची वॉलेट मर्यादा किमान १०० रुपये ते कमाल ५०० रुपये इतकी ठेवता येईल. शिवाय आवश्यकतेनुसार ५० रुपयांच्या पटीत कार्ड रिचार्ज करता येणार आहे. ईटीआयएम मशीन, अधिकृत संकेतस्थळ, मोबाईल प किंवा नियुक्त एजंटच्या माध्यमातून हे कार्ड रिचार्ज करता येईल.

### एनसीएमसी कार्ड कुणासाठी?

या योजनेत समाजातील विविध घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात शालेय व तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या 'सरल' क्रमांकाशी संलग्न कार्ड दिले जाणार आहे. अमृत ज्येष्ठ नागरिक, सर्वसाधारण ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना आधारसंलग्न स्मार्ट कार्ड देण्यात येणार आहे. दिव्यांग प्रवाशांना यूडीआयडी क्रमांकाशी जोडलेले कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य संग्राम सैनिक, अधिस्वीकृतीधारक पत्रकार आणि राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्यांना विभागीय कार्यालयातील मुख्यालयामार्फत या कार्डचे वितरण केले जाणार आहे.

### आणखी तीन महिने प्रतिक्षा

या संबंधाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी एसटीचे विभागीय व्यवस्थापक श्रीकांत गभणे यांच्याकडे संपर्क केला असता त्यांनी ही योजना सुरू व्हायला आणखी दोन ते तीन महिन्यांचा अवधी लागेल, असे सांगितले.

### बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया

ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या सोयीसाठी महामंडळाकडून राज्यभरात ३००० हून अधिक एजंट नियुक्त करण्यात आले आहेत. बसस्थानकांवरच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करता येणार असल्याचा दावा महामंडळाकडून करण्यात आला आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे, महामंडळाने यापूर्वी सवलतीधारक प्रवाशांसाठी स्मार्ट कार्ड योजना सुरू केली होती. मात्र, काही महिन्यातच या योजनेचा बोजवारा उडाला.

# पालकमंत्री बावनकुळे यांच्यावर दलित वस्ती विकास कामे स्थगितीचा आरोप

## ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दलित व नवबौद्ध वस्तीतील विकास कामांना स्थगिती दिल्याचा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आला आहे. याबाबत जिल्हा महासचिव सागर भवते यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, २४ जानेवारी रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. या बैठकीत अनुसूचित जाती घटकांसाठी मंजूर झालेल्या विकास कामांच्या निधीबाबत चर्चा झाली. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित कामांवर मंजूर निधी खर्च करणे अपेक्षित असताना, पालकमंत्री यांनी आपल्या अधिकारांचा वापर करून काही कामांना स्थगिती देण्याचे आदेश दिल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मंजूर झालेला निधी रोखता येत नाही, तसेच त्यात बदल किंवा स्थगिती देणे नियमबाह्य असल्याचे सागर भवते यांनी स्पष्ट केले. अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या वस्तीतील नागरिकांवर हा अन्याय असल्याचा आरोप करत त्यांनी संबंधित निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी केली आहे.याप्रकरणी पालकमंत्र्यांविरोधात अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ट्रॉसिटी क्ट) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांकडेही तक्रार दाखल करण्यात येणार असल्याची माहिती भवते यांनी दिली.दरम्यान, या आरोपांबाबत पालकमंत्री बावनकुळे यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप प्राप्त झालेली नाही. प्रशासनाकडून या तक्रारीवर काय भूमिका घेतली जाते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# शेंदोळा खुर्द येथे सुर्यगंगा नदी पात्रात अज्ञात इसमाचा मृतदेह आढळला

## पोलिसांकडून पंचनामा; शवविच्छेदनासाठी तिवसा येथे हलविण्यात आला मृतदेह

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३तिवसा**

तालुक्यातील शेंदोळा खुर्द ग्रामहद्दीत सुर्यगंगा नदीच्या पात्रात एका अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आल्याची घटना शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी उघडकीस आली.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ७ वाजताच्या सुमारास काही शेतकरी व मजूर शेताकडे जात असताना नदीच्या पात्रात झाडाजवळ एक मृतदेह पडलेला दिसून आला. ही माहिती गावात पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली.प्राथमिक अंदाजानुसार संबंधित मृतदेह हा सहा ते सात दिवसांपूर्वीचा असावा. पाण्यातील मासे व इतर प्राण्यांनी मृतदेहाचे काही भाग कुरतडल्यामुळे त्याची ओळख पटविणे कठीण झाले आहे.घटनेची माहिती मिळताच तिवसा पोलिस स्टेशन चे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह नदीपात्रातून बाहेर काढला. त्यानंतर पुढील तपासासाठी मृतदेह तिवसा उपजिल्हा शासकीय रुग्णालय येथे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.या घटनेमुळे शेंदोळा खुर्द परिसरात खळबळ उडाली असून, मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न पोलिसांकडून सुरू आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# पथ विक्रेता अधिनियम २०१४चे उल्लंघन? हॉकर्स झोन बैठकीस स्थगितीची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

अमरावती महानगरपालिका प्रशासन पथ विक्रेता (संरक्षण व नियमन) अधिनियम २०१४ नुसार कामकाज करत नसल्याचा आरोप करत पथ विक्रेता संघटनांनी २९ हॉकर्स झोन मंजुरीसाठी बोलावलेल्या बैठकीस स्थगिती देण्याची मागणी केली आहे. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी होणारी ही बैठक तातडीने रद्द करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.संघटनेच्या वतीने सादर केलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, प्रथम पथ विक्रेता योजना तयार करून तिचा प्रारूप आराखडा राज्य शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणे आवश्यक आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच हॉकर्स झोनला अंतिम मंजुरी देणे कायदेशीरदृष्ट्या योग्य ठरेल. मात्र प्रशासनाने हा क्रम न पाळता परस्पर संमतीने निर्णय घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे.संघटनेचे म्हणणे आहे की, अद्याप पथ विक्रेता समिती अधिसूचित करण्यात आलेली नाही तसेच समितीला राज्य शासनाची मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे समिती वैध स्वरूपात अस्तित्वात नसताना झोन मंजुरीचा निर्णय घेणे चुकीचे आहे. संबंधित निर्णय तत्काळ रद्द करून प्रथम समिती अधिसूचित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, महानगरपालिकेच्या प्रशासन शाखेकडून जावक क्रमांक ५४०/२०२६ अन्वये १३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता मनपा आयुक्त तथा पथ विक्रेता समिती अध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली बैठक बोलावण्यात आल्याचे पत्र देण्यात आले आहे. या बैठकीत २९ फेरीवाला क्षेत्र (हॉकर्स झोन) बहुमताने मंजूर करण्याचा विषय ठेवण्यात आल्याची माहिती आहे.मात्र, जोपर्यंत पथ विक्रेता योजना प्रारूप तयार करून शासनाची मान्यता मिळत नाही, तोपर्यंत हॉकर्स झोन मंजुरीची बैठक रद्द करण्यात यावी, अशी नम्र विनंती संघटनेने प्रशासनाकडे केली आहे. याबाबत आयुक्तांनी योग्य ते आदेश देऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.पथ विक्रेत्यांच्या प्रश्नावर प्रशासन काय भूमिका घेते, याकडे शहरातील फेरीवाल्यांचे लक्ष लागले आहे.

# अमरावती शहरासह महावितरणच्या ४२ उपविभागात दिर्घ पदयात्रा

## हजारो कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवत केला महावितरणच्या स्मार्ट मीटर व योजनांचा जागर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

महावितरणच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविणे, वीज चोरी विरोधात वातावरण निर्मिती करणे, वीज ग्राहकांमध्ये वीजबिल वेळेत भरणे, स्मार्ट मीटरच्या अचूकतेबाबत जनजागृती निर्माण करणे, वीज अपघात टाळणे, तसेच महावितरणच्या कर्मचाऱ्यांमध्ये संघ भावना निर्माण होवून त्याचा फायदा वीज ग्राहकांना होईल या उद्देशाने अमरावती शहरासह महावितरणच्या ४२ विभाग-उपविभागात, दीर्घ पदयात्रा (लॉंग मार्च) काढण्यात आली.

अमरावती शहरात सायन्स कोर मैदान येथून काढण्यात आलेल्या दीर्घ पदयात्रेचे नेतृत्व मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले. यावेळी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, दीपाली माडेलवार, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, कार्यकारी अभियंता राजेश माहुलकर,अमित बुटे, प्रणाली विश्लेषक नितिन नांदुरकर, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, वरिष्ठ व्यवस्थापक शिरीष शहा, व्यवस्थापक विकास बांबल यांची प्रमुख उपस्थिती होती.महावितरणमध्ये ९ ते २३ फेब्रुवारी या काळात स्मार्ट मिटर पंधरवाडा राबविण्यात येत आहे. या पंधरवाड्यात स्मार्ट मिटरचे फायदे वीज ग्राहकांना समजावून सांगण्यात येणार आहे. या पधंरवाड्याचा भाग म्हणून आज अमरावती परिमंडळात जनजागृति दिर्घ पदयात्रेचे नियोजन करण्यात आले.सायंन्स कोअर मैदान येथून सुरू झालेली पदयात्रा पुढे रुक्मिणी नगर, कल्याण नगर, रेडीयंट हॉस्पिटल बापटवाडी, विवेकानंद कॉलोनी ते पुन्हा सायन्स कोर मैदान येथे विद्युत सुरक्षेची शपत घेऊन पदयात्रेची सांगता करण्यात आली. पदयात्रेदरम्यान राज्य शासन व महावितरणच्या योजना ग्राहकांपर्यंत पोहचवण्यासाठी स्मार्ट मीटर, वीजबिल भरा सहकार्य करा, थकबाकी भरा, महावितरणची कटू कार्यवाही टाळा, प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप योजनांचा बॅनर व फलकाच्या माध्यमातून जागर करण्यात आला.

# चांदुर बाजार तहसील कार्यालयासह अनेक शासकीय कार्यलयात जलशुद्धीकरण यंत्रे बंद, माठ अडगळीत अवस्थेत,नागरीकांची गैरसोय



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ चांदुर बाजार**

उन्हाळ्याची चाहूल लागली आहे व उन्हाची तीव्रताही वाढीली असून चांदूर बाजार तहसील कार्यालय सह अनेक शासकीय कार्यालयात जलशुद्धीकरण यंत्रे बंद आहे व माठ अडगळीत अवस्थेत असल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असल्याच चित्र आहे उन्हाळा सुरू झाला की गरज भासते ती पाण्याची चांदूर बाजार शहरातील विविध सरकारी कार्यालयात नागरिकांची मोठी वर्दळ असते परंतु या ठिकाणी आता पिण्याच्या पाण्याची सोयच नसल्याने गरिबांना तोंडचे पाणी गिळून गप्प रहावे लागत आहे तर हॉटेल किंवा टपरीमध्ये उपलब्ध पाण्यावर तहाण भागावावी लगात आहे चांदूर बाजार शहर हे तालुक्याच ठिकाण असल्याने शहरात तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालय व दुय्यम निबंधक कार्यलयासह विविध शासकीय कार्यालय आहेत मात्र बऱ्याच कार्यालयात पाण्याची व्यवस्था राहत असून कार्यालयात अधिकाऱ्यांसाठी मिनरल वॉटर, कर्मचाऱ्यांसाठी जार आहेत परंतु, नागरिकांना तोंडचे पाणी गिळून घर गाठावे लागत असतानाच हॉटेलमध्ये जाऊन पाण्यासाठी चहा प्यावा लागतो हे विशेष तहान लागली की पूर्वी चौका चौकामध्ये पाणपोई असायची रस्त्याने जाता येता घशाला पडलेली कोरड दूर करताना चार घोट गार पाणी खाली उतरले की हायसे वाटायचे मात्र आता काही बोटावर मोजण्याइतपत पाणपोई सोडल्या तर शोधूनही या पाणपोई सापडत नाहीत्यामुळे तो सेवाभावाचाही अनुभव दुरापास्त होऊन बसला



आहे अगोदर उन्हाळ्याच्या आधीपासूनच त्याचे प्लॅनिंग केले जात होते चांदूर बाजार शहरातील अनेक शासकीय कार्यालयात पाण्याचे माठ अडगळीत अवस्थेत आहे व जलशुद्धीकरण यंत्रे ही बंद अवस्थेत आहे त्यामुळे तात्काळ उपाय योजना करण्यात यावी अशी मागणी आता नागरिक करित आहे.

### नगरपालिकेने पाण्याची सोय करणे आवश्यक!

शहरातील वर्दळीच्या ठिकाणी नगरपालिकेने पाण्याची सोय करणे आवश्यक आहे परंतु पालिका प्रशासन याकडे कधीच लक्ष देत नाही परिणामी, घराबाहेर पडलेल्या नागरिकांना पाणी पिण्यासाठी पुन्हा घरीच जावे लागते किंवा हॉटेलमधून पाण्याची बाटली खरेदी करून आपली तहाण भागवावी लागते त्यामुळे उन्हाची तीव्रता वाढण्या अगोदर पालिका प्रशासनाला उपाय योजना करणे गरजेचं आहे.

### पाण्याच्या पाईपलाईनचे काम सुरु आहे; तहसीलदार सोनारकर

चांदुर बाजार तहसील कार्यालयात पाईप लाईनेचे काम सुरु आहे व जलशुद्धीकरण यंत्राच्या साफ सफाईचे काम सुरु आहे व हिवाळ्यात नागरिक पनी पित नाही लवकरच नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करू अशी माहिती चांदुर बाजार तहसीलदार मनोज सोनारकर यांनी दिली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
विदर्भ प्रजासत्ताक
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत